७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक **संध्या**

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

बुधवार, दि. ०८ जुलै २०२६

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : १९३ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ३ रूपये


# मुख्यमंत्री तातडीने दिल्लीत

## एकीकडे पवारांची राष्ट्रवादी एनडीएत येण्याची चर्चा, दुसरीकडे फडणवीस अमित शाहांची भेट घेणार

**मुंबई (दै. संध्या)**



एकीकडे जयंत पाटील आणि विनोद तावडेंच्या भेटीच्या बातमीनंतर पवारांची राष्ट्रवादी भाजपसोबत जाणार का अशा चर्चा सुरू असतानाच एक मोठी बातमी समोर आली आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे दिल्लीमध्ये पोहोचले आहेत. देवेंद्र फडणवीस हे दिल्लीमध्ये केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यासोबत महत्त्वाच्या बैठकीत सहभागी होणार आहेत. बहुचर्चित आणि आंतरराज्यीय महत्त्वाच्या असलेल्या नर्मदा नदी खोऱ्यातील प्रकल्पांसंदर्भात नवी दिल्लीत एक अत्यंत मोठी आणि निर्णायक बैठक होत आहे. नर्मदा प्रकल्पाशी संबंधित असलेल्या विविध प्रलंबित मुद्द्यांवर चर्चा करण्यासाठी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे विशेष विमानाने दिल्लीत दाखल झाले आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या अध्यक्षतेखाली ही उच्चस्तरीय बैठक पार पडणार आहे.

नर्मदा खोऱ्यातील धरणांमुळे विस्थापित झालेल्या हजारो प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन, त्यांना मिळणारी नुकसान भरपाई आणि त्यांच्या मूलभूत हक्कांशी संबंधित अनेक गंभीर प्रश्न गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित आहेत. या पार्श्वभूमीवर या प्रश्नांवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी केंद्र सरकारने पुढाकार घेतला असून, या बैठकीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

नवी दिल्लीत होणाऱ्या या बैठकीला केंद्रीय जलसंपदा मंत्री सी. आर. पाटील यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. नर्मदा प्रकल्पाचा विस्तार आणि त्यातील पाणी वाटप तसेच पुनर्वसनाचा भाग हा एकापेक्षा जास्त राज्यांशी जोडलेला असल्याने या बैठकीला सर्व संबंधित राज्यांच्या प्रमुखांना पाचारण करण्यात आले आहे. बैठकीत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबतच मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव, राजस्थानचे मुख्यमंत्री भजनलाल शर्मा आणि गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल हे देखील उपस्थित राहणार आहेत. नर्मदा नदी आणि त्यावरील प्रकल्पांचा लाभ आणि परिणाम या चारही राज्यांवर होत असल्याने, सर्व मुख्यमंत्र्यांची एकत्र बैठक घेऊन प्रलंबित विषय मार्गी लावण्याचा गृह मंत्रालयाचा प्रयत्न आहे.

नर्मदा बचाव आंदोलन आणि विविध संघटनांच्या माध्यमातून नर्मदा खोऱ्यातील प्रकल्पग्रस्तांकडून आपल्या न्याय्य हक्कांसाठी वारंवार आंदोलनं केली जातात. जमीन संपादन, घरांची झालेली पडझड, योग्य भरपाई न मिळणे आणि पुनर्वसनाच्या ठिकाणी मूलभूत सुविधांचा असलेला अभाव यांबाबत प्रकल्पग्रस्तांनी अनेकदा प्रशासनाकडे खंत व्यक्त केली आहे. अनेकदा आंदोलनं करूनही स्थानिक प्रशासनाकडून ठोस दखल घेतली जात नसल्याची भावना विस्थापितांमध्ये आहे.

## पतसंस्थांचा समावेश करण्यासाठी प्रस्ताव सादर करा : डॉ. पंकज भोयर



**मुंबई (दै. संध्या)**

ग्रामीण भागासोबत पतसंस्थांची नाळ जुळलेली आहे. कर्जवाटप प्रक्रियेत पतसंस्थांचा समावेश झाल्यास अधिकाधिक युवकांना उद्योजकतेसाठी तसेच रोजगार निर्मितीसाठी आवश्यक अर्थसहाय्य मिळण्यास मदत होईल.त्यासाठी याबाबत सर्वसमावेशक प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश सहकार राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी दिले. अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या माध्यमातून मराठा समाजातील तरुणांना उद्योगासाठी दिल्या जाणाऱ्या अर्थसहाय्याची प्रक्रिया अधिक सुलभ करण्यासाठी बँकांसोबतच सक्षम पतसंस्थांचाही समावेश करण्यासंदर्भात सहकार राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक झाली. बैठकीस अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील, दक्षिण कराडचे आमदार डॉ. अतुलबाबा भोसले, सहकार विभागाचे वरिष्ठ अधिकारी, सहकार आयुक्त व निबंधक कार्यालयाचे प्रतिनिधी व इतर संबंधित अधिकारी उपस्थित होते. सहकार राज्यमंत्री डॉ पंकज भोयर म्हणाले, सध्या महामंडळामार्फत उद्योगासाठीचे अर्थसहाय्य बँकांद्वारे केले जाते. तसेच कर्जधारकांनी जमा केलेल्या व्याजाचा परतावाही संबंधित बँकांमार्फत दिला जातो. हेच काम सक्षम पतसंस्थांमार्फतही प्रभावीपणे करता येऊ शकते. पतसंस्थांची नाळ ग्रामीण भागाशी जुळलेली असते. त्यामुळे कर्जवाटपाची प्रक्रिया अधिक वेगवान आणि लाभार्थ्यांसाठी सोयीची होईल. यासाठी पतसंस्थांची निवड करताना विशिष्ट निकष निश्चित करण्याचे निर्देश मंत्री श्री भोयर यांनी यावेळी दिले.

## ८ जुलैपासून राज्यातील बहुतांश भागांमध्ये पावसात घट

**मुंबई (दै. संध्या)**



- पुढील 10 दिवस ब्रेक मिळण्याची शक्यता
- कृषी विभागाचा शेतकऱ्यांना मोठा सल्ला

जुलै महिन्याच्या सुरुवातीला मुंबई, ठाणे, कोकण आणि पश्चिम महाराष्ट्राला अतिवृष्टीने झोडपून काढले असले, तरी आता राज्यासाठी एक अत्यंत महत्त्वाची बातमी समोर आली आहे. येत्या ८ जुलैपासून महाराष्ट्रातील बहुतांश भागांमध्ये पावसाचा जोर लक्षणीयरीत्या कमी होणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. पावसाची ही विश्रांती किमान पुढील १० दिवस कायम राहण्याची शक्यता असून, या काळात अनेक जिल्ह्यांमध्ये सरासरीपेक्षा कमी पाऊस अपेक्षित आहे, अशी माहिती सरकारच्या वतीने देण्यात आली आहे.

हवामान विभागाच्या प्राथमिक अंदाजानुसार, जुलै महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यात (१५ जुलैपर्यंत) राज्याच्या काही भागांत धुवांधार पाऊस झाला असला, तरी दुसऱ्या पंधरवड्यात पावसाचे प्रमाण अत्यंत कमी (अत्यल्प) राहू शकते. पाऊस कमी होणार असल्याने राज्यातील कमाल तापमानात पुन्हा वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यामुळे नागरिकांना काहीसा उकाडा सहन करावा लागू शकतो. मुंबई आणि घाटमाथ्यावर पावसाने धुमाकूळ घातला असला, तरी राज्यातील अनेक भागांत अजूनही सरासरीपेक्षा कमी पाऊस झाला आहे. यामध्ये प्रामुख्याने खानदेश (धुळे आणि नंदुरबार), मध्य महाराष्ट्र (अहिल्यानगर व सोलापूर), पश्चिम विदर्भ आणि मराठवाड्याच्या काही भागांचा समावेश आहे, जिथे अजूनही दमदार पावसाची प्रतीक्षा आहे.

# लोणावळ्यात रिसॉर्ट परिसरात भूस्खलन

## दरड कोसळून दोघे अडकले; शोधमोहिम सुरू, प्रशासन अलर्ट मोडवर

**पुणे (दै. संध्या)**



राज्यातील मुसळधार पावसामुळे अनेक जिल्ह्यात जनजीवन विस्कळीत झाले असून काही ठिकाणी पुराच्या घटनाही घडल्या आहेत. तर, काही ठिकाणी झाडपडी, घर कोसळण्याचे प्रकार समोर आले आहेत, लोणावळा घाटात दरडी कोसळल्याच्याही घटना समोर आल्या आहेत. त्यातच, लोणावळा येथील नॉर्थ पॉइंट आणि थ्री सिक्सटी रिसॉर्ट परिसरात आज अचानक भीषण भूस्खलन झाल्याची धक्कादायक घटना घडली. या दुर्घटनेत दोन व्यक्ती ढिगाऱ्याखाली अडकल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे.

घटनेची माहिती मिळताच प्रशासनाचे मदत पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले असून, एसडीओ महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली शोध व बचावकार्य युद्धपातळीवर सुरू करण्यात आले आहे. मातीचा ढिगारा बाजूला करून अडकलेल्या नागरिकांना सुखरूप बाहेर काढण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले जात आहेत. त्यातच, पुण्याच्या जिल्हाधिकाऱ्यांनी लोणावळ्यातील पर्यटनस्थळी कलम 163 लागू केले आहे. त्यामुळे, पर्यटनस्थळी काही निर्बंध घालण्यात आले आहेत.

दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा ड्रीम प्रोजेक्ट असलेल्या मुंबई-पुणे कनेक्टींग लिंकवर देखील दरड कोसळल्याची घटना घडली होती. त्यानंतर, प्रशासनाने तातडीने कार्यवाही करत ती दरड हटविण्याचे काम केले. मात्र, 24 तास येथील वाहतूक बंद झाली होती.

मुंबई-गोवा महामार्गवरील लोटे येथे वाहतूक पोलीस चौकीसमोर डोंगरावरील दरडीचा भाग कोसळला. मुसळधार पावसामुळे डोंगरातील मोठे दगड, माती आणि झाडे कोसळल्याने भूसखलनाचा धोका वाढला. गोव्याकडे जाणारी वाहतूक पोलिसांनी बंद करून दुसऱ्या लेनने सुरू केली आहे. मात्र, दरडी कोसळत असल्याने मातीचा मोठा ढीग रस्त्यावर कोसळण्याचा धोका निर्माण झाला आहे.

जुलै महिन्याच्या सुरुवातीला मुंबईसह पश्चिम महाराष्ट्रात अतिवृष्टी झाली असली तरी राज्यातील विविध भागांमध्ये आतापर्यंत सरासरी पेक्षा कमी पाऊस झाला आहे. विशेषतः खानदेश (धुळे व नंदुरबार), मध्य महाराष्ट्र (अहिल्यानगर व सोलापूर), पश्चिम विदर्भ आणि मराठवाड्यातील काही भागांमध्ये पावसाचे प्रमाण कमी आहे. 8 जुलैपासून राज्यातील बहुतांश भागांमध्ये पावसाच्या प्रमाणात लक्षणीय घट होण्याचा अंदाज असून, ही परिस्थिती किमान पुढील 10 दिवस कायम राहण्याची शक्यता आहे. या दरम्यान राज्यातील विविध भागांमध्ये सरासरीपेक्षा कमी पाऊस अपेक्षित आहे. तसेच राज्यातील कमाल तापमानात वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. हवामान विभागाच्या प्राथमिक अंदाजानुसार जुलै महिन्याच्या दुसऱ्या पंधरवड्यात पहिल्या पंधरवड्याच्या तुलनेत पावसाचे प्रमाण अत्यल्प राहू शकते. दरम्यान, शेतकऱ्यांनी हवामानाच्या या स्थितीनुसार शेतीचे नियोजन करावे.

## पत्नीवरच झाडल्या तीन गोळ्या

नांदेड (दै. संध्या) : जिल्ह्याच्या लोहा शहरातील शिक्षक कॉलनी परिसरात सोमवारी मध्यरात्री कौटुंबिक वादातून पतीने स्वतःच्या पत्नीवर गावठी कट्ट्यातून तब्बल तीन राऊंड गोळीबार केल्याची धक्कादायक घटना घडली. या प्राणघातक हल्ल्यात पत्नी गंभीर जखमी झाली असून, तिच्यावर नांदेड येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. दरम्यान, गोळीबारानंतर आरोपी पती घटनास्थळावरून फरार झाला आहे. पोलिसांकडून आरोपीचा शोध सुरू असून गोळीबाराच्या घटनेतील जखमी पत्नीची प्रकृती सध्या स्थिर असल्याची माहिती आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी विशाल जाधव आणि त्याची पत्नी अर्चना यांच्यात सोमवारी मध्यरात्री कडाक्याचे भांडण झाले. या वादातून विशालने रागाच्या भरात पत्नी अर्चनावर विनापरवाना गावठी कट्ट्यातून सलग तीन गोळ्या झाडल्या. यातील एक गोळी तिच्या कानाला चाटून गेली, तर दुसरी गोळी पाठीत घुसल्याने ती रक्ताच्या थारोळ्यात कोसळली, त्यानंतर तिला तातडीने नांदेडला हलवण्यात आले. सध्या तिच्यावर नांदेडमधील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. सुदैवाने पीडित महिला सुरक्षित असून तिची तब्येत सध्या स्थिर असल्याचे पोलिसांनी सांगितले.


क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा

SUBSCRIBE

www.sandhyaepaper.com


**ढिंग-टांग**




## टनकपूर–पिलीभीत रेल्वे सेवेचा शाहजहानपूरपर्यंत विस्तार

# दोन नवीन एक्सप्रेस गाड्यांना हिरवा झेंडा

**नांदेड (दै. संध्या)**



केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे नांदेड–मुंबई व टनकपूर–नांदेड या दोन नवीन एक्सप्रेस गाड्यांना हिरवा झेंडा दाखवून शुभारंभ केला. तसेच टनकपूर–पिलीभीत रेल्वे सेवेचा शाहजहानपूरपर्यंत विस्तारही करण्यात आला. याप्रसंगी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी व्हिडिओ संदेशाद्वारे उपस्थितांना संबोधित केले.

या निमित्ताने नांदेड, टनकपूर आणि पिलीभीत रेल्वे स्थानकांवर विशेष कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. टनकपूर येथे केंद्रीय राज्यमंत्री रवनीत सिंह, अजय टम्टा तसेच इतर लोकप्रतिनिधी उपस्थित होते. पिलीभीत येथे केंद्रीय राज्यमंत्री जितीन प्रसाद व इतर मान्यवर उपस्थित होते. त्याचवेळी नांदेड रेल्वे स्थानकावर खासदार अशोकराव शंकरराव चव्हाण, नांदेड-वाघाळा महानगरपालिकेच्या महापौर मा. सौ. कविता संतोष मुळे, खासदार मा. डॉ. अजित माधवराव गोपछडे, खासदार मा. श्री. रवींद्र वसंतराव चव्हाण, खासदार मा. बळवंत बसवंत वानखेडे, विधान परिषदेचे सदस्य अमरनाथ अनंतराव राजूरकर तसेच इतर मान्यवर उपस्थित होते. दक्षिण मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक श्री. संजय कुमार श्रीवास्तव, नांदेड विभागाचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक श्री. प्रदीप कामले तसेच इतर रेल्वे अधिकारीही या कार्यक्रमास उपस्थित होते.

उपस्थितांना संबोधित करताना केंद्रीय रेल्वेमंत्री मा. श्री. अश्विनी वैष्णव यांनी सांगितले की, टनकपूर–नांदेड एक्सप्रेसची सुरुवात ही जनतेच्या दीर्घकाळापासूनच्या अपेक्षांची पूर्तता आहे. ही नवीन रेल्वे सेवा उत्तराखंड आणि महाराष्ट्र यांच्यातील रेल्वे संपर्क अधिक मजबूत करेल तसेच नांदेड येथील पवित्र तख्त सचखंड श्री हजूर साहिब गुरुद्वाराला जाणाऱ्या भाविकांसाठी मोठी सुविधा ठरेल. त्यांनी पुढे सांगितले की, नांदेड–मुंबई एक्सप्रेसमुळे मराठवाडा परिसरातील, विशेषतः वाशीम, हिंगोली आणि बसमत येथील प्रवाशांना मुंबईशी अधिक सुलभ रेल्वे संपर्क उपलब्ध होईल.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली गेल्या 12 वर्षांत भारतीय रेल्वेने केलेल्या प्रगतीचा उल्लेख करताना त्यांनी सांगितले की, या कालावधीत 37,000 किलोमीटरहून अधिक नवीन रेल्वेमार्ग टाकण्यात आले असून रेल्वे जाळ्याचे 99.6 टक्के विद्युतीकरण पूर्ण झाले आहे. बुलेट ट्रेन प्रकल्प तसेच समर्पित मालवाहतूक मार्ग (Dedicated Freight Corridors) वेगाने प्रगतीपथावर असल्याचे त्यांनी नमूद केले. मध्यमवर्गीय आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना परवडणारा व सुरक्षित प्रवास उपलब्ध करून देण्यासाठी विविध राज्यांमध्ये सातत्याने नवीन रेल्वे सेवा सुरू करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

यावर्षी जून महिन्यापर्यंत उन्हाळी हंगामात 15,000 हून अधिक विशेष गाड्या चालविण्यात आल्या असून, दिवाळी आणि छठ उत्सवादरम्यान सुमारे 12,000 विशेष गाड्या चालविण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री. देवेंद्र फडणवीस यांनी दोन्ही नवीन रेल्वे सेवांच्या प्रारंभाबद्दल जनतेचे अभिनंदन केले. त्यांनी सांगितले की, नांदेड–मुंबई एक्सप्रेसमुळे मराठवाड्यातील विशेषतः बसमत, हिंगोली, वाशीम, अकोला आणि नांदेड जिल्ह्यांतील प्रवाशांना मुंबईसाठी थेट आणि सोयीस्कर रेल्वे संपर्क उपलब्ध होईल. तसेच टनकपूर–नांदेड एक्सप्रेसमुळे उत्तराखंड व उत्तर प्रदेशातील भाविकांना नांदेड येथील पवित्र सचखंड गुरुद्वाराला जाणे अधिक सुलभ होईल.

## संभाव्य पूरस्थितीवर मात करण्यासाठी जिल्हा प्रशासन सतर्क आणि सज्ज – जिल्हाधिकारी डॉ. मैनाक घोष

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना आढावा बैठकीत दिला विश्वास

**सांगली (दै. संध्या)**



हवामान खात्याच्या पावसाच्या इशाऱ्याच्या अनुषंगाने जिल्हा प्रशासनाने अत्यावश्यक सर्व पूर्वतयारी पूर्ण केली आहे. संबंधित सर्व यंत्रणा सतर्क असून, संभाव्य पूर परिस्थितीवर मात करण्यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज आहे, असा विश्वास जिल्हाधिकारी डॉ. मैनाक घोष यांनी आज दूरदृश्यप्रणालीद्वारे झालेल्या आढावा बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिला. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील पूरप्रवण व पूरबाधित जिल्ह्यांच्या सज्जतेचा आढावा मुंबईतून दूरदृष्यप्रणालीद्वारे घेतला. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. मैनाक घोष यांनी जिल्ह्यातील पर्जन्यमान, कृष्णा व वारणा नद्यांची वाढती पाणीपातळी, बचाव व मदतकार्याची तयारी, स्थलांतराचे नियोजन तसेच विविध विभागांनी केलेल्या पूर्वतयारीची माहिती सादर केली.

सांगली जिल्ह्यात आज रोजी आपत्तीप्रवण स्थिती नाही, असे सांगून जिल्हाधिकारी डॉ. घोष म्हणाले, आपत्ती व्यवस्थापनाच्या अनुषंगाने रंगीत तालीम घेऊन नागरिकांना माहिती देण्यात आली आहे. सांगली जिल्ह्यात राष्ट्रीय आपत्ती निवारण प्राधिकरणचे एक पथक 1 जुलै रोजी दाखल झाले आहे. हे पथक संभाव्य पूरस्थितीच्या ठिकाणी भेट देऊन पाहणी करत आहे. आपत्ती निवारणाच्या अनुषंगाने पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आवश्यक ती सर्व पूर्वतयारी केली असून वेळोवेळी आवश्यकतेनुसार आढावा घेतला जात आहे. संबंधित सर्व यंत्रणा परस्पर समन्वय राखून आहेत, असे त्यांनी यावेळी सांगितले.

या बैठकीस जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली येथून जिल्हाधिकारी यांच्यासह निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. स्नेहल कनिचे, तहसीलदार लीना खरात, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी रफिक नदाफ तसेच, पोलीस अधीक्षक तुषार दोशी दूरदृष्यप्रणालीद्वारे उपस्थित होते.

हवामान खात्याने दिलेल्या अंदाजानुसार आगामी पाच दिवसात सांगली जिल्ह्यात मुसळधार पावसाची शक्यता कमी असून, जिल्हा ग्रीन झोन मध्ये आहे. परंतु सातारा व कोल्हापूर जिल्ह्यात होणाऱ्या पावसाच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासन परिस्थितीवर लक्ष ठेऊन आहे. सांगली विभागाचे आजचे सरासरी पर्जन्यमान 14.6 मि. मी. आहे. आयर्विन पुलाची इशारा पातळी 40 फूट व धोका पातळी 45 फूट आहे. आज रोजी आयर्विन पुलाची पाणीपातळी 12.6 फूट आहे. सद्यस्थितीत वारणा धरण 42 टक्के भरले आहे.

धरणाची क्षमता 34.40 टी. एम. सी. असून आज रोजी धरणात 14.59 टी. एम. सी पाणीसाठा आहे. सांगली जिल्ह्यात दि. 6 जुलै रोजी कृष्णा नदीवरील पाण्याखाली तीन बंधारे असून, त्यामध्ये बहे (ता. वाळवा), सांगली (ता. मिरज), म्हैशाळ (ता. मिरज) यांचा समावेश आहे. सांगली जिल्ह्यात जास्तीचा पाऊस शिराळा तालुक्यात पडला असून, मांगले सावर्डे पुलावर पाणी आल्याने, त्या रस्त्यावरील वाहतूक बंद करण्यात आली आहे. पर्यायी रस्ता म्हणून मांगले काखे पुलावरून वाहतूक सुरू आहे. या रस्त्याचा वाहतुकीसाठी वापर करावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

## संपादकीय

# ओझोनचे विषारी संकट

ओझोन प्रदूषणाची पातळी चिंताजनक पातळीवर पोचते आहे. या विषारी संकटात दिल्ली आज प्रयोगशाळा ठरली असेल; पण उद्या त्याच प्रयोगाचे परिणाम अनिर्बंध फोफावलेल्या मुंबईसह अन्य महानगरांनाही भोगावे लागू शकतात.

दिल्ली हे विलक्षण महानगर आहे. इथं सरकार कोणाचंही आलं-गेलं, कसल्याही घोषणा झाल्या तरी दर वर्षी नेमाने होणारी चर्चा म्हणजे भारताच्या या राष्ट्रीय राजधानीतलं नेमेची येणारं प्रदूषण. पण आता 'भूपृष्ठीय ओझोन' अर्थात ग्राउंड-लेव्हल ओझोन नावाचा अदृश्य आणि अधिक कपटी शत्रू दिल्ली-एनसीआरला कसा गिळत चालला आहे याबाबतचं ताजं वृत्त दिल्लीकरांसाठी आणखी चिंताजनक ठरणारं आहे. पर्यावरणीय प्रदूषणाला शहरे-राज्ये-जात-धर्म यांच्या मर्यादा नसल्यानं ही केवळ आकडेवारी नाही; ही आपल्या शहरांच्या भविष्यातील आरोग्य प्रगतिपुस्तकावरची लाल शाईतली नोंद ठरावी, असा इशारा या वृत्तात आहे. मुंबईसह बहुतांश महानगरांत प्रमाणाच्या आणि व्यवस्थेच्या आटोक्याबाहेर गेलेलं वाहन प्रदूषण, औद्योगिक उत्सर्जन, उष्णतेच्या लाटा आणि बदलतं हवामान यांची बेरीज केली, तर प्रदूषणाच्या बाबतीत नेहमी दिल्लीकडं बोट दाखवता दाखवता उद्या मुंबई, ठाणे, पुणे, नागपूर, नाशिक आदी महानगरांचीही अवस्था 'अकस्मात तोही पुढे जात आहे' अशी झाली तर आश्चर्य नाही. शिक्षण-आरोग्य-पर्यावरणादी मुद्दे विकसित देशांत चालतात, आपल्याकडं दुर्दैवानं राजकारणाचा फड जिंकण्यासाठी ते उपयोगी ठरत नाहीत हे सत्य असलं तरी. मुळात ओझोन शब्द ऐकला की आपल्या डोळ्यांसमोर पृथ्वीभोवतीचं संरक्षक कवच उभं राहतं. ओझोनचा थर पृथ्वीला सूर्याच्या अतिनील किरणांपासून वाचवतो, ही विज्ञानाच्या पुस्तकातली माहिती शालेय वयापासूनच डोक्यात घट्ट बसलेली असते. पण पृथ्वीपासून १५ ते ३५ किलोमीटर उंचीवर असलेला जीवनदाता ओझोन जमिनीच्या पातळीवर तयार झाला की तो जीवघेण्या प्रदूषकाचं रूप घेतो. समताप मंडळातील ओझोन पृथ्वीचं कवच आहेच; पण जमिनीच्या पातळीवरचा ओझोन हा महाप्रदूषकाची भूमिका बजावतो. त्याची निर्मिती थेट कारखान्यांतून वगैरे होत नाही. (वर्तमानात इथेनॉलमिश्रित पेट्रोल पिऊन धावणाऱ्या!) वाहनांमधून बाहेर पडणारे नायट्रोजन ऑक्साइड्स, उद्योगांतील बाष्पशील सेंद्रिय संयुगं आणि दिल्लीत जास्तीत जास्त मुक्काम ठोकणाऱ्या उन्हाळ्यातली भयानक उष्णता यांची युती झाली की त्यातून रासायनिक अभिक्रिया होऊन हा अदृश्य विषारी वायू तयार होतो तो अधिक धोकादायक ठरतो. केंद्रीय विज्ञान आणि पर्यावरण केंद्रानं (सीएसई) २०२१ ते २०२६ या सहा वर्षांच्या आकडेवारीचं विश्लेषण करून नुकताच प्रसिद्ध केलेला अहवाल वरील बातमीचा आधार. हा अहवाल भारताच्या प्रदूषणविषयक धोरणालाच प्रश्न विचारतो. यासार दिल्ली-एनसीआर (राष्ट्रीय राजधानी क्षेत्र) हा देशातील सर्वांत मोठा ओझोन हॉटस्पॉट बनला आहे. दिल्ली, नोएडा, ग्रेटर नोएडा, गाझियाबाद, फरीदाबाद येथे उन्हाळ्यात दररोज सुरक्षित मर्यादेपेक्षा अधिक ओझोन नोंदवला गेला. दिल्लीत अनेक वायूमापक निरीक्षण केंद्रांवर गेले अनेक दिवस ओझोन प्रदूषणाची सरासरी रोज मर्यादा ओलांडत होती. ग्रेटर नोएडात तब्बल ४४ दिवस ओझोनची पातळी धोकादायक होती. दिल्ली-एनसीआरमध्ये तब्बल ४६ रात्री अशा नोंदल्या गेल्या, ज्या वेळी रात्रीही ओझोनची पातळी सुरक्षित मर्यादेपेक्षा जास्त होती. 'टॉक्सिक नाइट्स' हे दिल्ली-एनसीआरमध्ये आता वास्तव होत आहे. दिवसाचे भोग भोगून घरी परतलेल्या नागरिकांना झोपेतही विषारी हवा श्वासातून आत घेत राहावी लागत असेल, तर त्यापेक्षा शोकांतिका कोणती? हा ओझोन फुप्फुसांच्या महत्त्वाच्या पेशींना थेट इजा पोहोचवतो, कोणत्याही वयोगटातील व्यक्तीसाठी श्वासनलिकांत सूज निर्माण करतो. दमा, ॲलर्जी, श्वास घेण्यास त्रास, डोळ्यांची जळजळ, छातीत दुखणं आणि हृदयविकाराचा झटका येण्याचा धोका तो वाढवतो. स्वतः हरित-गृह वायू असलेल्या ओझोनचं नुकसान केवळ माणसांपुरतं मर्यादित नाही, तर ओझोन प्रदूषणाचं संकट अन्नसुरक्षा, अर्थव्यवस्था आणि हवामान यांच्याशी जोडलेली राष्ट्रीय समस्या झाली आहे.

## संस्कृत सुभाषित

श्मशानमापदं दैन्य दृष्टवा को न विरज्यते
तद्वैराज्यं परं श्रेय: स्वतो यदभिजायते
स्मशान, दारिद्र्य, संकट हे पाहून कोणाला वैराग्य येणार नाही?ण ते टिकत मात्र नाही. स्वत:च्या विचारीतून जे वैराग्य निर्माण होते, ते सदैव टिकते.

## गुरु वचन

### जीवनाचे चार आधार

सुसंस्कारितेचे चार आधार आहेत– समजुतदारपणा, प्रामाणिकपणा, जबाबदारपणा आणि शूरपणा. यांना आध्याात्मिक–आंतरिक वरिष्ठतेच्या दृष्टीत तेवढेच महत्वाचे मानले गेले पाहिजे जेवढे शरीरासाठी अन्न, पाणी, वस्त्र आणि निवारा अनिवार्य समजले जाते. समजुतदारपणाचा अर्थ असा की, दूरदर्शी विवेकशीलता अवलंबिणे. एरवी लोक तात्पुरत्या फायद्यालाच सर्वस्व मानतात. तो मिळविण्यासाठी चुकीचे पाउलही उचलतात. त्यामुळे भविष्य अंधकारमय बनते.

गुन्हेगारी घटक याच मनोवृत्तीचे असतात.दूरदर्शिता, विवेकशीलता अनुभवी शेतकऱ्याच्या कामासारखे आहे. ज्यानुसार शेत नांगरणे, बीज पेरणे, खत पाणी देणे, देखभाल करण्यात सुरूवातीचे नुकसान आणि कष्ट सहन केले जातात. दूरदर्शिता सांगते की, याचे फळ काळानुसार मिळणार आहे.

एका बीजाच्या दाण्याच्या बदल्यात अनेक पट दाणे मिळणार आहेत. संयम आणि सत्कार्य अशीच बुद्धिमत्ता आहे. पुण्य परमार्थात भविष्य उज्ज्वल बनविणारी शक्यता अंतर्भूत असते. संयमाचे फळ वैभव आणि पौरुषाच्या रूपात दृष्टिंगत होणार असते. दूर्बिणच्या आधारे दूरपर्यंतची वस्तु पाहिली जाऊ शकते आणि त्या माहिती आधारे अधिक बुद्धिमत्तापूर्ण निर्णय घेतला जाऊ शकतो. अध्यात्माच्या भाषेत यालाच तृतीय नेत्र खुलणे म्हणतात. त्या आधारे संकटापासून वाचणे आणि उज्ज्वल भविष्याची निर्मिती शक्य आहे.

कथनी–करनी एक ठेवणे यास प्रामाणिकपणा म्हणतात. सहयोग व सद्भाव अर्जित करण्यासाठी प्रामाणिमपणा प्रमुख आधार आहे. याला आपल्या व्यवसायात स्वीकारून अनेक लोकांनी मोठे यश मिळविले आहे. मोठी जबाबदारी उपलब्ध करणे आणि ती पार पाडण्यात प्रामाणिकपणा यश देतो.

सुसंस्कारितेचा तिसरा भाग आहे जबाबदारी. बेजबाबदार उत्तरदायित्वापासून निर्लज्जतापूर्वक इंकार करू शकतात. मात्र जबाबदार लोकांना आपले उत्तरदायित्व नियमबद्धपणे पार पाडता येते. जो आरोग्य सुरक्षित ठेवण्याचा जीवन संपदेचा श्रेष्ठतम सदुपयोग करण्याचा, लोक परलोक उत्कृष्ट बनविण्याची जबाबदारी पार पाडतो, तोच संतोष, यश आरोग्याचा लाभ प्राप्त करू शकतो. चौथा व अंतिम टप्पा आहे– शूरपणा. दैनिक जीवनात अनेकानेक अडचणींचा सामना करावा लागतो. त्यासाठी साहस आवश्यक आहे. अन्यथा गडबडीत योग्य उपाय सुचणार नाही.

## उपदेशकथा

### खरी अहिंसा

एका गावामध्ये एक साात्विक मनुष्य राहात असे. जीवनावर त्याचे खरे प्रेम होते त्यामुळे माणसे, पशु–पक्षी, कृमी–कीटक सर्व जीव त्याला आवडत. सर्व माणसे त्याला साधू म्हणून ओळखत. एके दिवशी स्वच्छ सूर्यप्रकाश पडला होता. जिकडे तिकडे प्रसन्नता पसरलेली होती. तो शेताकडे चालला असता वाटेमध्ये मुंग्यांचा थवा जात होता, तो पाहून त्याला मोठे कौतुक वाटले. इतक्यात आरडाओरडा ऐकू आला. समोरच्या तळ्यामध्ये एक माणूस बुडत होता. जीव–प्राण्यांवर प्रेम करणाऱ्या माणसाने ते पाहिले आणि विचार न करता तो हजारो मुंग्या तुडवीत गेला आणि बुडणाऱ्या माणसाला त्याने वाचविले. लोक म्हणू लागले, 'अहो, हे कसले जीवप्राण्यांवरील प्रेम? एका माणसाचा जीव वाचविण्यासाठी किती तरी मुंग्या बळी गेल्या!' त्याची अहिंसा समजून घेणारा त्याला अजून भेटला नाही.

कथा उपदेश : मनुष्यप्राण्याचा जीव वाचविण्यासाठी अशी किरकोळ हिंसा क्षम्य असते.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | अयन– दक्षिणयन |
| ८ जुलै २०२६ | मास– निज ज्येष्ठ |
| बुधवार | ऋतु– सौर वर्षा |
| विक्रम संवत्– २०८२ | कृष्ण पक्ष |
| निज ज्येष्ठके | तिथि:अष्टमी १२:२१:५८ |
| संवत्– १९४८ | नक्षत्र:रेवती १६:००:०० |
| संवत्सर –पराभवनाम | योग:अतिगण्ड १२:३७:२३ |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. १००४

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 9 | | | 3 | | | 2 | |
| | 2 | 8 | 9 | 4 | | | | 6 |
| 3 | | 4 | | 8 | 2 | | 5 | 7 |
| 1 | | | | | | | | 5 |
| 8 | | | 7 | | 5 | | | 3 |
| 9 | | | | | | | | 2 |
| 2 | 8 | | 4 | 1 | | 7 | | 9 |
| 4 | | | | 7 | 9 | 5 | 3 | |
| | 3 | | | 5 | | | 4 | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयात केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

सूडोकु क्र. १००३ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 6 | 9 | 7 | 5 | 3 | 1 | 8 | 2 | 4 |
| 5 | 2 | 8 | 9 | 4 | 7 | 3 | 1 | 6 |
| 3 | 1 | 4 | 6 | 8 | 2 | 9 | 5 | 7 |
| 1 | 7 | 2 | 3 | 9 | 4 | 6 | 8 | 5 |
| 8 | 4 | 6 | 7 | 2 | 5 | 1 | 9 | 3 |
| 9 | 5 | 3 | 1 | 6 | 8 | 4 | 7 | 2 |
| 2 | 8 | 5 | 4 | 1 | 3 | 7 | 6 | 9 |
| 4 | 6 | 1 | 2 | 7 | 9 | 5 | 3 | 8 |
| 7 | 3 | 9 | 8 | 5 | 6 | 2 | 4 | 1 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १४९७ – वास्को दा गामाने भारताकडे समुद्रमार्गे प्रयाण केले.
- २००६ – पश्चिम आशियाच्या उत्तर गाजामध्ये इस्त्रायलच्या लष्कराने केलेल्या विमान व तोफ हल्ल्यात ७ पॅलेस्टिनी मारले गेले.
- २००७ – चीनमधील पुरात २६ जण ठार झाले.

### राष्ट्रीय

- २००६ – गाजियाबादमध्ये रिलायन्स पावर प्लँटला विरोध करणाऱ्या शेतकऱ्यांवर पोलिसांनी गोळीबार केला. या घटनेत ५० पेक्षा जास्त शेतकरी जखमी झाले.
- २००६ – बिहारमधील समस्तीपूर जिल्ह्याच्या मुसरीघरारी पोलिस स्टेशनच्या हद्दीत ट्रक आणि डम्परच्या झालेल्या अपघातात दोन्ही वाहने पेटल्याने तीन जणाचा होरपळून मृत्यु झाला.
- २००७ – ताजमहालने सात आश्चर्यात स्थान पटकावले.

### जन्म

- १९०८ – प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ वी. के. आर. वी. राव.
- १९१४ – ज्योती बसू , बंगाली राजकारणी.
- १९१६ – मराठी कादंबरीकार, चरित्रकार गोपाळ नीलकंठ दांडेकर.
- १९७२ – सौरव गांगुली, भारतीय क्रिकेटपटू.

### निधन

- १९७९ – सिन–इतिरो–तोमोनागा, जपानी भौतिकशास्त्रज्ञ व नोबेल पारितोषिक विजेता.
- २००१ – उस्ताद बाळासाहेब मिरजकर, तबला विभूषण.
- २००७ – चंद्रशेखर,भारताचे माजी पंतप्रधान.
- २००८ – ब्रम्हाक्षर, 'शिवण्यापासून लिवण्यापर्यंत' अशा पुस्तकांचे लेखक रमण माळवदे यांचे निधन.

## : SMS :

Kitne % Bhartiyon ko Lagta hy k Salman Khan, Katrina Kaif se Shadi Karega?
Ans: 10%
Bcoz
Rest of the 90% wants to Marry Katrina Kaif themselves.

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | २७.१ | २४.१ |
| अहमदनगर | २६.२ | २४ |
| अकोला | ३५.७ | २६ |
| अमरावती | ३७.२ | २६ |
| बीड | ३७.२ | २६.६ |
| भंडारा | ३५.८ | २६.६ |
| बुलढाणा | ४८ | ३४.९ |
| चंद्रपूर | ३६.५ | २७ |
| चेन्नई | ४२.२ | २८.९ |
| नवी दिल्ली | ४७.८ | ३६.१ |
| धुळे | ३४.७ | २६.७ |
| गोंदिया | ३३.१ | २६.२ |
| जळगाव | ३६.३ | २५.६ |
| कोल्हापूर | २६.१ | २३.९ |
| लातूर | ३१ | २३.७ |
| मुंबई | ३४.४ | २७.४ |
| नागपूर | ३७.१ | २६.६ |
| नांदेड | ३३.९ | २५.८ |
| नंदूरबार | ३६.२ | २६.१ |
| नाशिक | २६.३ | २४.५ |
| पुणे | २४.६ | २३.६ |
| पंढरपूर | ३४.१ | २५.४ |
| सातारा | २६.८ | २४ |
| सांगली | २७.३ | २४.२ |
| सोलापूर | ३४.३ | २५ |
| वर्धा | ३७.६ | २६.२ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग–हिरवा, शुभ दिशा– पूर्व प्रतिष्ठीत भेटी होतील. व्यापारात आपल्या निर्णयाचा फायदा मिळेल.

**तुळ :** शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा –दक्षिण व्यवसायिक समस्या दूर होईल. मुलांची प्रगती होईल.

**वृषभ :** शुभ रंग– निळा, शुभ दिशा– पूर्व उत्पन्नापेक्षा जास्त खर्च करू नका. व्यापारिक संकटामुळे चिंता राहून धावपळ वाढणार आहे.

**वृश्चिक :** शुभ रंग– लाल, शुभ दिशा–पश्चिम बुद्धीमत्तेवर अनेक समस्या दूर होतील. अचानक धनप्राप्ती होण्याचा योग आहे. प्रिय व्यक्तिची भेट होईल.

**मिथुन :** शुभ रंग– हिरवा – शुभ दिशा– पूर्व आर्थिक स्थिती चांगली राहिल्याने मन आनंदी राहील. कौटुंबिक चिंता दूर होऊ शकते.

**धनु :** शुभ रंग– गुलाबी, शुभ दिशा– पश्चिम मित्र किंवा सहकारी यांच्यावर जास्त विश्वास करू नका. मान प्रतीष्टा कमी होईल.

**कर्क :** शुभ रंग– पिवळा, शुभ दिशा– पश्चिम जीवनसाथीच्या प्रगतीमुळे सामाजिक मान सन्मान वाढणार आहे.

**मकर :** शुभ रंग– लाल – शुभ दिशा– पूर्व अचानक धन मिळण्याची शक्यता आहे. व्यवसायीक वाद आपल्या प्रयत्नामुळे संपुष्टात येईल.


**सिंह :** शुभ रंग– हिरवा, शुभ दिशा–दक्षिण व्यवहार कुशलतेमुळे अधिकारी खुष राहतील. वहान सुख मिळेल. आळस दूर करा.

**कुंभ :** शुभ रंग– पांढरा, शुभ दिशा– पूर्व प्रयत्न व दूरदर्शिपणा यामुळे आपल्याला इतरांकडून समर्थन मिळेल. आर्थिक स्थिती चांगली राहील.

**कन्या :** शुभ रंग– हिरवा, शुभ दिशा– दक्षिण कौटुंबिक सुख व पत्नीच्या सहयोगाने मन प्रसन्न राहील. स्वाध्यायात गोडी वाटेल.

**मीन :** शुभ रंग– पिवळा, शुभ दिशा– दक्षिण व्यापारातील हेतु साध्य होण्याकरिता प्रयत्न करावे लागतील. आकर्षक प्रस्ताव आपल्याला येतील.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. १००४



### आडवे शब्द

१. निकट
४. हत्तीचे तोंड असलेला याअर्थी गणपतीचे नाव
८. पातक
१०. राजा हरिश्चनचंद्राची पत्नी
१२. नवरा
१३. मनाला आलेला थकवा
१५. संतोष
१७. नंतर
१८. अंधार
१९. 'पॉवरलूम'ला मराठी शब्द
२१. नूतन, जुनाच्या विरुद्ध
२२. चांगले वर्तन
२३. सवय, राबता
२४. गाव, नगर
२५. प्रजा
२८. सगळीकडे
२९. प्रयत्न
३१. मागे सरणे, माघार घेणे
३३. फार उष्ण वा थंड नसलेले
३५. माहीत असलेले
३६. मंदिराच्या शिखराचे टोक
३७. मादीच्या विरुद्ध
३८. हटकून
३९. चौक
४०. गाणे
४२. हाताचा प्रहार, मार
४३. स्वच्छ, चकचकीत
४८. सर्वात खालचे पाताळ
५०. एक श्वासरोग
५२. लोक
५३. विपुल प्रमाणात आढळणारा जलचर
५५. अस्थिर संपत्ती
५६. श्रीविष्णूचे नाव
५७. थोरवी
५८. खून
६०. साप, मुंगी यांचे घर
६१. पोते
६३. मेंढपाळ
६५. लागून, जवळ
६७. मधुमक्षिका
७०. रेती
७१. सुस्ती, कंटाळा
७३. थोर, मोठा
७५. संपणे
७६. वयाने थोराड नवरदेव
७९. मनाला टोचणारे दु:ख
८०. मुलाची मुलगी
८१. क्वचित
८२. रांग
८३. उच्च–नीच नसणे

### उभे शब्द

१. समाजातील मतप्रवाह
२. अत्यंत कपटी
३. सरळ, लांब बांबू
४. वेग
५. वार्तापत्र
६. डोळे
७. ऐटबाज
९. बाज, खाट
११. अधिक महिना
१४. रम्य
१६. संकटकाळी देवाला बोलावणे
१७. असह्य वेदना
२०. हरवलेले सापडणे
२२. च्या बरोबर
२४. लाज
२५. धोबी
२६. तमाशातील कलावंत
२७. जाळणे
२९. बुद्धी
३०. जप्ती
३२. शेंगेवरचे आवरण
३३. नाजूक
३४. पत्र
३८. ठेकेदार
३९अ. हिंदीत उद्योग, प्रताप
४१. अगदी त्याप्रमाणे
४४. समाचार
४५. राग, चीड
४६. सर्वस्व
४७. आईचा भाऊ
४९. समशेर
५१. चंगळ, विपुलता
५४. दक्ष
५६. वेदनेने ओरडणे
५९. श्रीमंत
६२. किंमत
६४. बेंड
६६. पक्ष्यांचा राजा
६८. हवेतील थंडावा, गारवा
६९. समोरासमोरची झुंज
७१. दर्पण
७२. बेकरीतील एक पदार्थ
७४. हस्त
७५. पावसाची झड
७६. घोटाळा
७७. धंद्यातील फायदा
७८. ढीग
७९. वर्ष, साल

### जम्बो शब्दकोडे क्र. १००३ चे उत्तर

आडवे उत्तर : १.लोकमान्य बाळ गंगाधर टिळक १०.सम १२.कलप १३.गायक १४.पान १५.नवरदेव १७.मळकट २०.नव २१.नरकयातना २५.वतनवाडी २७.साईबाबा २९.वास ३०.काबाडकष्ट ३३.सदा ३४.माहेर ३५.बाजरी ३६.कमळ ३७.टर ३८.पास ३९.कसब ४१.टसर ४२.पहारेकरी ४४.सार ४५.तारका ४७.फट ४८.बारी ४९.पाप ५०.नटखट ५३.अचेतन ५५.कडवट ५६.सणवार ५७.हमाल ५८.वर्ण ६१.मूल ६३.रविवासर ६६.हास्यास्पद ६८.सारथी ६९.सरस ७०.नायक ७१.गाजरगवत ७२.करकरीत ७३.रणरण ७४.तरट

उभे उत्तर : १.लोकर २.कल ३.मापन ४.बाकरवडी ५.गंगावन ६.गाय ७.धकधक ८.टिळा ९.कपाळ १०.सपाट ११.मन १६.वनवास १७.मनाई १८.कडबा १९.भात २२.रगड २३.तसा २४.चवदार २५.वर्तमानपत्र २६.नवार २८.बावळट ३०.काज ३१.बारीजसारीक ३२.कबाब ३३.सटरफटर ३५.बासरी ३६.कबर ३८.पाक ४०.सर ४३.रेलचेल ४५.तापट ४६.कानस ४९.पावशेर ५१.टणत्कार ५२.खवा ५३.अमावस्या ५४.नवल ५९.दिवा ६०.सरसकट ६१.मूद ६२.परकर ६४.विरजण ६५.सलगता ६६.हाटक ६७.स्पर्धक ६८.साय ६९.सतत ७०.नात ७१.गार

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

### जाहीर नोटीस

**मा. उपविभागीय अधिकारी, उपविभागीय दंडाधिकारी जुन्नर-आंबेगाव यांचे कोर्टात.**

क्र. फौज जन्म-मृत्यू/एसआ/672/25 दिनांक:- 29.6.2026.

**नोटीस**

शेख अब्दुल रज्जाक यासिन पटेल, मु.पो. राजुरी, ता. जुन्नर, जि पुणे- **अपिलार्थी**

**विरुध्द**

निबंधक, जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी
ग्राम अधिकारी/मुख्याधिकारी ग्रामपंचायत राजुरी - **प्रतिवादी**

जाहीर नोटीस देण्यात येते की, वरील नमुद किरकोळ फौजदारी अर्जदार शेख अब्दुल रज्जाक यासिन पटेल मु.पो.राजुरी, ता. जुन्नर. जि पुणे यांची स्वत: नामे **शेख अब्दुल रज्जाक यासिन पटेल यांचा जन्म 26.6.1946 रोजी मौजे राजुरी, ता. जुन्नर जि. पुणे येथे झालेला आहे.** यांचा जन्म नोंदीचा हुकुम मिळविण्याकरीता अर्जदार यांनी या न्यायालयात जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम, कलम १३(३) प्रमाणे फौजदारी किरकोळ अर्ज नं. 672/25 दिनांक 24.11.2025 रोजी दाखल केलेला आहे. सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस वृतपत्रात प्रसिध्द झाल्यापासुन 15 दिवसांचे आत या न्यायालयात स्वत: अथवा आपले वकिलांमार्फत हजर राहून आपले म्हणने कागदपत्रांसोबत मांडावे. सदर कालावधीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर अर्जास कोणाचीही हरकत नसल्याचे समजून पुढील हुकुम करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दि. 29/6/2026 रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यांनीशी ही जाहीर नोटीस दिली असे.

**सही/-**
**(अर्चना तांबे)**
शिक्का
**अति. उपविभागीय दंडाधिकारी**
**जुन्नर- आंबेगाव उपविभाग मंचर (पुणे)**

### जाहीर नोटीस

**मा. उपविभागीय अधिकारी, उपविभागीय दंडाधिकारी जुन्नर-आंबेगाव यांचे कोर्टात.**

क्र. फौज जन्म-मृत्यू/एसआ/709/25 दिनांक:- 29.6.2026.

**नोटीस**

उस्मान बापू चौगुले, मु.पो. राजुरी, ता. जुन्नर, जि पुणे - **अपिलार्थी**

**विरुध्द**

निबंधक, जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी
ग्राम अधिकारी/मुख्याधिकारी ग्रामपंचायत राजुरी - **प्रतिवादी**

जाहीर नोटीस देण्यात येते की, वरील नमुद किरकोळ फौजदारी अर्जदार उस्मान बापू चौगुले मु.पो.राजुरी, ता. जुन्नर. जि पुणे यांची स्वत: नामे **उस्मान बापू चौगुले यांचा जन्म 2.2.1958 रोजी मौजे राजुरी, ता. जुन्नर जि. पुणे येथे झालेला आहे.** यांचा जन्म नोंदीचा हुकुम मिळविण्याकरीता अर्जदार यांनी या न्यायालयात जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम, कलम १३(३) प्रमाणे फौजदारी किरकोळ अर्ज नं. 709/25 दिनांक 10.12.2025 रोजी दाखल केलेला आहे. सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस वृतपत्रात प्रसिध्द झाल्यापासुन 15 दिवसांचे आत या न्यायालयात स्वत: अथवा आपले वकिलांमार्फत हजर राहून आपले म्हणने कागदपत्रांसोबत मांडावे. सदर कालावधीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर अर्जास कोणाचीही हरकत नसल्याचे समजून पुढील हुकुम करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दि. 29/6/2026 रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यांनीशी ही जाहीर नोटीस दिली असे.

**सही/-**
**(अर्चना तांबे)**
शिक्का
**अति. उपविभागीय दंडाधिकारी**
**जुन्नर- आंबेगाव उपविभाग मंचर (पुणे)**

### जाहीर नोटीस

**मा. उपविभागीय अधिकारी, उपविभागीय दंडाधिकारी जुन्नर-आंबेगाव यांचे कोर्टात.**

क्र. फौज जन्म-मृत्यू/एसआ/563/25 दिनांक:- 29.6.2026.

**नोटीस**

कासम अबु पटेल, मु.पो. राजुरी, ता. जुन्नर, जि पुणे - **अपिलार्थी**

**विरुध्द**

निबंधक, जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी
ग्राम अधिकारी/मुख्याधिकारी ग्रामपंचायत राजुरी - **प्रतिवादी**

जाहीर नोटीस देण्यात येते की, वरील नमुद किरकोळ फौजदारी अर्जदार कासम अबु पटेल मु.पो.राजुरी, ता. जुन्नर. जि पुणे यांची स्वत: नामे **कासम अबु पटेल यांचा जन्म 7.5.1962 रोजी मौजे राजुरी, ता. जुन्नर जि. पुणे येथे झालेला आहे.** यांचा जन्म नोंदीचा हुकुम मिळविण्याकरीता अर्जदार यांनी या न्यायालयात जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम, कलम १३(३) प्रमाणे फौजदारी किरकोळ अर्ज नं. 563/25 दिनांक 10.11.2025 रोजी दाखल केलेला आहे. सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस वृतपत्रात प्रसिध्द झाल्यापासुन 15 दिवसांचे आत या न्यायालयात स्वत: अथवा आपले वकिलांमार्फत हजर राहून आपले म्हणने कागदपत्रांसोबत मांडावे. सदर कालावधीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर अर्जास कोणाचीही हरकत नसल्याचे समजून पुढील हुकुम करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दि. 29/6/2026 रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यांनीशी ही जाहीर नोटीस दिली असे.

**सही/-**
**(अर्चना तांबे)**
शिक्का
**अति. उपविभागीय दंडाधिकारी**
**जुन्नर- आंबेगाव उपविभाग मंचर (पुणे)**

### जाहीर नोटीस

**मा. उपविभागीय अधिकारी, उपविभागीय दंडाधिकारी जुन्नर-आंबेगाव यांचे कोर्टात.**

क्र. फौज जन्म-मृत्यू/एसआ/650/25 दिनांक:- 29.6.2026.

**नोटीस**

जैबुन इनूस जमादार, मु.पो. राजुरी, ता. जुन्नर, जि पुणे - **अपिलार्थी**

**विरुध्द**

निबंधक, जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी
ग्राम अधिकारी/मुख्याधिकारी ग्रामपंचायत राजुरी - **प्रतिवादी**

जाहीर नोटीस देण्यात येते की, वरील नमुद किरकोळ फौजदारी अर्जदार जैबुन इनूस जमादार मु.पो.राजुरी, ता. जुन्नर. जि पुणे यांची स्वत: नामे **जैबुन इनूस जमादार यांचा जन्म 1.6.1965 रोजी मौजे राजुरी, ता. जुन्नर जि. पुणे येथे झालेला आहे.** यांचा जन्म नोंदीचा हुकुम मिळविण्याकरीता अर्जदार यांनी या न्यायालयात जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम, कलम १३(३) प्रमाणे फौजदारी किरकोळ अर्ज नं. 650/25 दिनांक 19.11.2025 रोजी दाखल केलेला आहे. सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस वृतपत्रात प्रसिध्द झाल्यापासुन 15 दिवसांचे आत या न्यायालयात स्वत: अथवा आपले वकिलांमार्फत हजर राहून आपले म्हणने कागदपत्रांसोबत मांडावे. सदर कालावधीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर अर्जास कोणाचीही हरकत नसल्याचे समजून पुढील हुकुम करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दि. 29/6/2026 रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यांनीशी ही जाहीर नोटीस दिली असे.

**सही/-**
**(अर्चना तांबे)**
शिक्का
**अति. उपविभागीय दंडाधिकारी**
**जुन्नर- आंबेगाव उपविभाग मंचर (पुणे)**

### जाहीर नोटीस

**मा. उपविभागीय अधिकारी, उपविभागीय दंडाधिकारी जुन्नर-आंबेगाव यांचे कोर्टात.**

क्र. फौज जन्म-मृत्यू/एसआ/937/25 दिनांक:- 29.6.2026.

**नोटीस**

हसिना कासम पटेल, मु.पो. राजुरी, ता. जुन्नर, जि पुणे - **अपिलार्थी**

**विरुध्द**

निबंधक, जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी
ग्राम अधिकारी/मुख्याधिकारी ग्रामपंचायत राजुरी - **प्रतिवादी**

जाहीर नोटीस देण्यात येते की, वरील नमुद किरकोळ फौजदारी अर्जदार हसिना कासम पटेल मु.पो.राजुरी, ता. जुन्नर. जि पुणे यांची स्वत: नामे **हसिना कासम पटेल यांचा जन्म 11.9.1974 रोजी मौजे राजुरी, ता. जुन्नर जि. पुणे येथे झालेला आहे.** यांचा जन्म नोंदीचा हुकुम मिळविण्याकरीता अर्जदार यांनी या न्यायालयात जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम, कलम १३(३) प्रमाणे फौजदारी किरकोळ अर्ज नं. 937/25 दिनांक 28.11.2025 रोजी दाखल केलेला आहे. सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस वृतपत्रात प्रसिध्द झाल्यापासुन 15 दिवसांचे आत या न्यायालयात स्वत: अथवा आपले वकिलांमार्फत हजर राहून आपले म्हणने कागदपत्रांसोबत मांडावे. सदर कालावधीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर अर्जास कोणाचीही हरकत नसल्याचे समजून पुढील हुकुम करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दि. 29/6/2026 रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यांनीशी ही जाहीर नोटीस दिली असे.

**सही/-**
**(अर्चना तांबे)**
शिक्का
**अति. उपविभागीय दंडाधिकारी**
**जुन्नर- आंबेगाव उपविभाग मंचर (पुणे)**

### जाहीर नोटीस

**मा. उपविभागीय अधिकारी, उपविभागीय दंडाधिकारी जुन्नर-आंबेगाव यांचे कोर्टात.**

क्र. फौज जन्म-मृत्यू/एसआ/648/25 दिनांक:- 29.6.2026.

**नोटीस**

बाबा मिठ्ठू सय्यद, मु.पो. राजुरी, ता. जुन्नर, जि पुणे - **अपिलार्थी**

**विरुध्द**

निबंधक, जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी
ग्राम अधिकारी/मुख्याधिकारी ग्रामपंचायत राजुरी - **प्रतिवादी**

जाहीर नोटीस देण्यात येते की, वरील नमुद किरकोळ फौजदारी अर्जदार बाबा मिठ्ठू सय्यद मु.पो.राजुरी, ता. जुन्नर. जि पुणे यांची स्वत: नामे **बाबा मिठ्ठू सय्यद यांचा जन्म 1.6.1967 रोजी मौजे राजुरी, ता. जुन्नर जि. पुणे येथे झालेला आहे.** यांचा जन्म नोंदीचा हुकुम मिळविण्याकरीता अर्जदार यांनी या न्यायालयात जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम, कलम १३(३) प्रमाणे फौजदारी किरकोळ अर्ज नं. 648/25 दिनांक 28.11.2025 रोजी दाखल केलेला आहे. सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस वृतपत्रात प्रसिध्द झाल्यापासुन 15 दिवसांचे आत या न्यायालयात स्वत: अथवा आपले वकिलांमार्फत हजर राहून आपले म्हणने कागदपत्रांसोबत मांडावे. सदर कालावधीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर अर्जास कोणाचीही हरकत नसल्याचे समजून पुढील हुकुम करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दि. 29/6/2026 रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यांनीशी ही जाहीर नोटीस दिली असे.

**सही/-**
**(अर्चना तांबे)**
शिक्का
**अति. उपविभागीय दंडाधिकारी**
**जुन्नर- आंबेगाव उपविभाग मंचर (पुणे)**

### जाहीर नोटीस

**मा. उपविभागीय अधिकारी, उपविभागीय दंडाधिकारी जुन्नर-आंबेगाव यांचे कोर्टात.**

क्र. फौज जन्म-मृत्यू/एसआ/735/25 दिनांक:- 29.6.2026.

**नोटीस**

निसार इन्नुस जमादार, मु.पो. राजुरी, ता. जुन्नर, जि पुणे - **अपिलार्थी**

**विरुध्द**

निबंधक, जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी
ग्राम अधिकारी/मुख्याधिकारी ग्रामपंचायत राजुरी - **प्रतिवादी**

जाहीर नोटीस देण्यात येते की, वरील नमुद किरकोळ फौजदारी अर्जदार निसार इन्नुस जमादार मु.पो.राजुरी, ता. जुन्नर. जि पुणे यांची स्वत: नामे **निसार इन्नुस जमादार यांचा जन्म 15.5.1975 रोजी मौजे राजुरी, ता. जुन्नर जि. पुणे येथे झालेला आहे.** यांचा जन्म नोंदीचा हुकुम मिळविण्याकरीता अर्जदार यांनी या न्यायालयात जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम, कलम १३(३) प्रमाणे फौजदारी किरकोळ अर्ज नं. 735/25 दिनांक 10.12.2025 रोजी दाखल केलेला आहे. सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस वृतपत्रात प्रसिध्द झाल्यापासुन 15 दिवसांचे आत या न्यायालयात स्वत: अथवा आपले वकिलांमार्फत हजर राहून आपले म्हणने कागदपत्रांसोबत मांडावे. सदर कालावधीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर अर्जास कोणाचीही हरकत नसल्याचे समजून पुढील हुकुम करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दि. 29/6/2026 रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यांनीशी ही जाहीर नोटीस दिली असे.

**सही/-**
**(अर्चना तांबे)**
शिक्का
**अति. उपविभागीय दंडाधिकारी**
**जुन्नर- आंबेगाव उपविभाग मंचर (पुणे)**

### जाहीर नोटीस

**मा. उपविभागीय अधिकारी, उपविभागीय दंडाधिकारी जुन्नर-आंबेगाव यांचे कोर्टात.**

क्र. फौज जन्म-मृत्यू/एसआ/598/25 दिनांक:- 29.6.2026.

**नोटीस**

अमिना कासम पटेल, मु.पो. राजुरी, ता. जुन्नर, जि पुणे - **अपिलार्थी**

**विरुध्द**

निबंधक, जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी
ग्राम अधिकारी/मुख्याधिकारी ग्रामपंचायत राजुरी - **प्रतिवादी**

जाहीर नोटीस देण्यात येते की, वरील नमुद किरकोळ फौजदारी अर्जदार अमिना कासम पटेल मु.पो.राजुरी, ता. जुन्नर. जि पुणे यांची स्वत: नामे **अमिना कासम पटेल यांचा जन्म 14.5.1966 रोजी मौजे राजुरी, ता. जुन्नर जि. पुणे येथे झालेला आहे.** यांचा जन्म नोंदीचा हुकुम मिळविण्याकरीता अर्जदार यांनी या न्यायालयात जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम, कलम १३(३) प्रमाणे फौजदारी किरकोळ अर्ज नं. 598/25 दिनांक 10.11.2025 रोजी दाखल केलेला आहे. सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस वृतपत्रात प्रसिध्द झाल्यापासुन 15 दिवसांचे आत या न्यायालयात स्वत: अथवा आपले वकिलांमार्फत हजर राहून आपले म्हणने कागदपत्रांसोबत मांडावे. सदर कालावधीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर अर्जास कोणाचीही हरकत नसल्याचे समजून पुढील हुकुम करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दि. 29/6/2026 रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यांनीशी ही जाहीर नोटीस दिली असे.

**सही/-**
**(अर्चना तांबे)**
शिक्का
**अति. उपविभागीय दंडाधिकारी**
**जुन्नर- आंबेगाव उपविभाग मंचर (पुणे)**

### जाहीर नोटीस

**मा. उपविभागीय अधिकारी, उपविभागीय दंडाधिकारी जुन्नर-आंबेगाव यांचे कोर्टात.**

क्र. फौज जन्म-मृत्यू/एसआ/284/25 दिनांक:- 29.6.2026.

**नोटीस**

युसुफ कासम पठाण, मु.पो. राजुरी, ता. जुन्नर, जि पुणे - **अपिलार्थी**

**विरुध्द**

निबंधक, जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी
ग्राम अधिकारी/मुख्याधिकारी ग्रामपंचायत राजुरी - **प्रतिवादी**

जाहीर नोटीस देण्यात येते की, वरील नमुद किरकोळ फौजदारी अर्जदार युसुफ कासम पठाण मु.पो.राजुरी, ता. जुन्नर. जि पुणे यांची स्वत: नामे **युसुफ कासम पठाण यांचा जन्म 2.6.1970 रोजी मौजे राजुरी, ता. जुन्नर जि. पुणे येथे झालेला आहे.** यांचा जन्म नोंदीचा हुकुम मिळविण्याकरीता अर्जदार यांनी या न्यायालयात जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम, कलम १३(३) प्रमाणे फौजदारी किरकोळ अर्ज नं. 284/25 दिनांक 15.9.2025 रोजी दाखल केलेला आहे. सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस वृतपत्रात प्रसिध्द झाल्यापासुन 15 दिवसांचे आत या न्यायालयात स्वत: अथवा आपले वकिलांमार्फत हजर राहून आपले म्हणने कागदपत्रांसोबत मांडावे. सदर कालावधीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर अर्जास कोणाचीही हरकत नसल्याचे समजून पुढील हुकुम करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दि. 29/6/2026 रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यांनीशी ही जाहीर नोटीस दिली असे.

**सही/-**
**(अर्चना तांबे)**
शिक्का
**अति. उपविभागीय दंडाधिकारी**
**जुन्नर- आंबेगाव उपविभाग मंचर (पुणे)**

### जाहीर नोटीस

**मा. उपविभागीय अधिकारी, उपविभागीय दंडाधिकारी जुन्नर-आंबेगाव यांचे कोर्टात.**

क्र. फौज जन्म-मृत्यू/एसआ/653/25 दिनांक:- 29.6.2026.

**नोटीस**

सुलेमान वजीर चौगुले, मु.पो. राजुरी, ता. जुन्नर, जि पुणे - **अपिलार्थी**

**विरुध्द**

निबंधक, जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी
ग्राम अधिकारी/मुख्याधिकारी ग्रामपंचायत राजुरी - **प्रतिवादी**

जाहीर नोटीस देण्यात येते की, वरील नमुद किरकोळ फौजदारी अर्जदार सुलेमान वजीर चौगुले मु.पो.राजुरी, ता. जुन्नर. जि पुणे यांची स्वत: नामे **सुलेमान वजीर चौगुले यांचा जन्म 1.6.1942 रोजी मौजे राजुरी, ता. जुन्नर जि. पुणे येथे झालेला आहे.** यांचा जन्म नोंदीचा हुकुम मिळविण्याकरीता अर्जदार यांनी या न्यायालयात जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम, कलम १३(३) प्रमाणे फौजदारी किरकोळ अर्ज नं. 653/25 दिनांक 28.11.2025 रोजी दाखल केलेला आहे. सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस वृतपत्रात प्रसिध्द झाल्यापासुन 15 दिवसांचे आत या न्यायालयात स्वत: अथवा आपले वकिलांमार्फत हजर राहून आपले म्हणने कागदपत्रांसोबत मांडावे. सदर कालावधीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर अर्जास कोणाचीही हरकत नसल्याचे समजून पुढील हुकुम करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दि. 29/6/2026 रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यांनीशी ही जाहीर नोटीस दिली असे.

**सही/-**
**(अर्चना तांबे)**
शिक्का
**अति. उपविभागीय दंडाधिकारी**
**जुन्नर- आंबेगाव उपविभाग मंचर (पुणे)**

### जाहीर नोटीस

**मा. उपविभागीय अधिकारी, उपविभागीय दंडाधिकारी जुन्नर-आंबेगाव यांचे कोर्टात.**

क्र. फौज जन्म-मृत्यू/एसआ/796/25 दिनांक:- 29.6.2026.

**नोटीस**

रेश्मा युसुफ पटेल, मु.पो. राजुरी, ता. जुन्नर, जि पुणे - **अपिलार्थी**

**विरुध्द**

निबंधक, जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी
ग्राम अधिकारी/मुख्याधिकारी ग्रामपंचायत राजुरी - **प्रतिवादी**

जाहीर नोटीस देण्यात येते की, वरील नमुद किरकोळ फौजदारी अर्जदार अब्दुल गफ्फार गुलाम अहमद सौदागर मु.पो. जुन्नर, ता. जुन्नर. जि पुणे यांची स्वत: नामे **अब्दुल गफ्फार गुलाम अहमद सौदागर यांचा जन्म 1.6.1951 रोजी मौजे जुन्नर, ता. जुन्नर जि. पुणे येथे झालेला आहे.** यांचा जन्म नोंदीचा हुकुम मिळविण्याकरीता अर्जदार यांनी या न्यायालयात जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम, कलम १३(३) प्रमाणे फौजदारी किरकोळ अर्ज नं. 480/25 दिनांक 30.10.2025 रोजी दाखल केलेला आहे. सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस वृतपत्रात प्रसिध्द झाल्यापासुन 15 दिवसांचे आत या न्यायालयात स्वत: अथवा आपले वकिलांमार्फत हजर राहून आपले म्हणने कागदपत्रांसोबत मांडावे. सदर कालावधीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर अर्जास कोणाचीही हरकत नसल्याचे समजून पुढील हुकुम करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दि. 29/6/2026 रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यांनीशी ही जाहीर नोटीस दिली असे.

शिक्का

**सही/-**
**(अर्चना तांबे)**
**अति. उपविभागीय दंडाधिकारी**
**जुन्नर- आंबेगाव उपविभाग मंचर (पुणे)**

### जाहीर नोटीस

**मा. उपविभागीय अधिकारी, उपविभागीय दंडाधिकारी जुन्नर-आंबेगाव यांचे कोर्टात.**

क्र. फौज जन्म-मृत्यू/एसआ/764/25 दिनांक:- 29.6.2026.

**नोटीस**

शिरीन मकबुल शहा, मु.पो. जुन्नर, ता. जुन्नर, जि पुणे - **अपिलार्थी**

**विरुध्द**

निबंधक, जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी
ग्राम अधिकारी/मुख्याधिकारी जुन्नर नगरपरिषद - **प्रतिवादी**

जाहीर नोटीस देण्यात येते की, वरील नमुद किरकोळ फौजदारी अर्जदार शिरीन मकबुल शहा मु.पो. जुन्नर, ता. जुन्नर. जि पुणे यांची स्वत: नामे **शिरीन मकबुल शहा यांचा जन्म 5.7.1969 रोजी मौजे जुन्नर, ता. जुन्नर जि. पुणे येथे झालेला आहे.** यांचा जन्म नोंदीचा हुकुम मिळविण्याकरीता अर्जदार यांनी या न्यायालयात जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम, कलम १३(३) प्रमाणे फौजदारी किरकोळ अर्ज नं. 764/25 दिनांक 10.12.2025 रोजी दाखल केलेला आहे. सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस वृतपत्रात प्रसिध्द झाल्यापासुन 15 दिवसांचे आत या न्यायालयात स्वत: अथवा आपले वकिलांमार्फत हजर राहून आपले म्हणने कागदपत्रांसोबत मांडावे. सदर कालावधीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर अर्जास कोणाचीही हरकत नसल्याचे समजून पुढील हुकुम करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दि. 29/6/2026 रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यांनीशी ही जाहीर नोटीस दिली असे.

शिक्का

**सही/-**
**(अर्चना तांबे)**
**अति. उपविभागीय दंडाधिकारी**
**जुन्नर- आंबेगाव उपविभाग मंचर (पुणे)**




दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक



## थोडक्यात पण महत्वाचे

महाराष्ट्र शासन

### प्रवेश प्रक्रियेच्या विशेष फेरीस मुदतवाढ

मुंबई (दैनिक संध्या) : राज्यातील काही भागांमध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना सुट्टी जाहीर करण्यात आल्याने इयत्ता अकरावीच्या केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेतील विशेष फेरी-१ चे सुधारित वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. यानुसार विद्यार्थ्यांना प्रवेश निश्चित करण्यासाठी ८ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. शिक्षण संचालनालयाने दिलेल्या माहितीनुसार, शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी राज्यातील ९ हजार ६८८ कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये अकरावी प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. आतापर्यंत १४ लाख ७३ हजार ४२० विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असून त्यापैकी १० लाख ८ हजार ९४ विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित केला आहे. विशेष फेरी-१ अंतर्गत ज्या विद्यार्थ्यांना कनिष्ठ महाविद्यालयाचे वाटप झाले आहे, त्यांना संबंधित महाविद्यालयात आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करून प्रवेश निश्चित करण्यासाठी ८ जुलैपर्यंतची मुदत देण्यात आली आहे. विद्यार्थ्यांनी 'Proceed for Admission' पर्यायाचा वापर करून प्रवेश प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

### पूरस्थितीचा आदिती तटकरे यांनी घेतला आढावा

मुंबई (दैनिक संध्या) : राज्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी मंत्रालयातील राज्य आपत्कालीन कार्य केंद्रात आपत्ती व्यवस्थापन विभागाचे संचालक श्री. भालचंद्र चव्हाण यांच्याकडून रायगड, रत्नागिरीसह राज्यातील पूरस्थितीचा सविस्तर आढावा घेतला. भारतीय हवामान विभागाने रायगड जिल्ह्यासाठी आज व उद्या मुसळधार पावसाचा रेड अलर्ट जारी केला असून रत्नागिरी जिल्ह्यासाठीही रेड अलर्ट देण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर पुढील ४८ तास दोन्ही जिल्ह्यांसाठी अत्यंत महत्त्वाचे असल्याने प्रशासनाला आवश्यक त्या सर्व खबरदारीच्या उपाययोजना तत्काळ राबविण्याच्या सूचना देण्यात आल्या असल्याचे महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी सांगितले. संभाव्य आपत्तीजन्य परिस्थितीचा सामना करण्यासाठी महाड येथे राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाची (NDRF) तुकडी सज्ज ठेवण्यात आली आहे. तसेच सुधागड व रोहा परिसरात आपत्कालीन परिस्थितीत अधिक वेगाने आणि प्रभावीपणे प्रतिसाद देता यावा, यासाठी १४५ जवानांची अतिरिक्त तुकडी उपलब्ध करून देण्याची मागणीही करण्यात आली असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

### कळमोडी धरण ओव्हरफ्लो

चास (दैनिक संध्या) : खेड तालुक्याच्या पश्चिम भागातील आरळा नदीवरील कळमोडी धरण शंभर टक्के भरले असल्याची माहिती प्रकल्पाचे सहाय्यक अभियंता श्रेणी 2 शुभम सुसुंद्रे यांनी दिली आहे, धरण पूर्ण क्षमतेने भरून पाणी सांडव्यावरून वाहू लागले असून सांडव्यातून होणारा पाण्याचा अनियंत्रित विसर्ग आरळा नदी मार्गे चासकमान धरणात येऊन मिळत असल्याने चासकमान धरणातील पाणी साठा वेगाने वाढू लागला आहे. कळमोडी धरणाची एकूण पाणी साठवण क्षमता १.५ टीएमसी इतकी आहे. गेल्या वर्षी धरण २४ जून रोजी भरले होते. यंदा मात्र पावसाने आगमनासाठी थोडा विलंब केल्याने धरण भरण्यास सुद्धा विलंब झाला आहे. गेल्या तीन दिवसांपासून धरणाच्या पाणलोट क्षेत्रातील खरपुड, परसूल, भोमाळे, घोटवडी परिसरात पावसाची संततधार सुरू आहे. या संततधार पावसामुळे परिसरातील ओढे, नाले दुथडी भरून वाहू लागले. परिणामी कळमोडी धरण सोमवारी (ता.६) रात्री उशिरा पूर्ण क्षमतेने भरले. शुक्रवारी (ता.३) सकाळी धरणातील पाणी साठा फक्त २२ टक्के एवढा होता, परंतु गेल्या तीन दिवसात त्यात मुख्यत्वे रविवार व सोमवारी झालेल्या मुसळधार पावसाची मदत धरण पूर्ण क्षमतेने भरण्यास झाली. धरण क्षेत्रात एकूण ५२६ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. धरण भरल्याने दरवाजा विरहीत धरणाच्या सांडव्यावरून सध्या प्रती सेकंद सुमारे ६७०० क्युसेकपेक्षा अधिक पाण्याचा विसर्ग आरळा नदीपात्रात सुरु आहे. कळमोडी धरण 'ओव्हर फ्लो' झाल्यामुळे खालच्या भागात असलेल्या चासकमान धरणामधील पाणीसाठा वेगाने वाढण्यास मोठी मदत होत आहे.

# मुंबईतील परिस्थिती पूर्णपणे नियंत्रणात

## मुंबईकरांचे सहकार्य आणि प्रशासकीय यंत्रणेचे काम कौतुकास्पद : मंत्री मंगलप्रभात लोढा

■ मुंबई (दै. संध्या)

गेल्या दोन-तीन दिवसांपासून मुंबईत सुरू असलेल्या मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर मुंबईतील जनजीवन आणि परिस्थिती पूर्णपणे नियंत्रणात असून, मुंबईकरांनी संकटसमयी प्रशासनाला केलेले सहकार्य अतिशय मोलाचे आहे, असे प्रतिपादन मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी आज केले. मुंबई महानगरपालिकेच्या आपत्कालीन व्यवस्थापन नियंत्रण कक्षाला प्रत्यक्ष भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतल्यानंतर ते प्रसारमाध्यमांशी बोलत होते.




याप्रसंगी सभागृह नेता श्री. गणेश खणकर, महानगरपालिका आयुक्त श्रीमती अश्विनी भिडे (IAS), अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) श्रीमती प्राजक्ता वर्मा – लवंगारे (IAS), अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पूर्व उपनगरे) श्री. अविनाश ढाकणे (IAS), उपायुक्त (आरोग्य) श्री. शरद उघडे आणि महानगरपालिकेचे संबंधित वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी परिस्थितीवर प्रकाश टाकताना सांगितले की, मुख्यमंत्री महोदयांनी विधानसभेत नमूद केल्याप्रमाणे हा निसर्गाचा मोठा प्रकोप असून ही अभूतपूर्व परिस्थिती आहे. एकाच दिवसात शहरात ३५० पेक्षा जास्त झाडे उन्मळून पडल्याची घटना घडली. मात्र, अशा कठीण परिस्थितीतही महानगरपालिकेचे डिषास्टर डिपार्टमेंट आणि सरकारी यंत्रणा अत्यंत वेगाने आणि युद्ध पातळीवर रस्त्यांवरील झाडे हटवणे व पाण्याचा निचरा करण्याचे काम करत आहेत. नागरिकांची, विशेषतः लांबच्या अंतरावरून प्रवास करणाऱ्यांची कोणतीही गैरसोय होऊ नये म्हणून प्रशासनाने अत्यंत सतर्कतेने पावले उचलली आहेत. एक आवश्यक खबरदारीचा उपाय (Precautionary Measure) म्हणून सकाळी शाळा-कॉलेजेसना सुट्टी जाहीर करण्यात आली आणि त्यानंतर दुपारच्या सत्रात सरकारी कार्यालयांनाही सुट्टी देण्यात आली, जेणेकरून प्रवाशांना सुरक्षितपणे घरी पोहोचता येईल. मंत्री लोढा यांनी अत्यंत सकारात्मकता व्यक्त करत सांगितले की, एवढ्या मोठ्या संकटानंतरही मुंबई कुठेही थांबलेली नाही. खबरदारीमुळे लोकल रेल्वेचा वेग काहीसा संथ असला तरी वाहतूक पूर्णपणे सुरू आहे. रस्त्यांवरील पाणी आणि झाडे पूर्णपणे साफ करून रस्ते वाहतुकीसाठी मोकळे करण्यात आले आहेत. "गेल्या तीन दिवसांपासून महानगरपालिकेचे अधिकारी आणि कर्मचारी दिवस-रात्र एक करून ऑन-फील्ड काम करत आहेत. संकटसमयी राजकारण न करता आपण सर्वांनी प्रशासनाच्या पाठीशी उभे राहिले पाहिजे आणि त्यांच्या या अविरत परिश्रमांचे कौतुक (Appreciation) केले पाहिजे," असे आवाहन मंत्री लोढा यांनी यावेळी केले. पुढे बोलताना त्यांनी सांगितले की, ९० किमी प्रतितास वेगाने वारे वाहण्याची शक्यता लक्षात घेऊन मुख्यमंत्र्यांच्या सूचनेनुसार सर्वांना व्हॉट्सअॅपद्वारे सतर्कतेचे संदेश पाठवण्यात आले असून, पुढील कोणत्याही परिस्थितीचा सामना करण्यासाठी संपूर्ण प्रशासकीय यंत्रणा सज्ज आहे.

# राज्यात १७ राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (NDRF) पथके तैनात

■ राज्यात काही जिल्ह्यांमध्ये पावसाचा जोर
■ लोणावळा येथे ६७० मिमी पावसाची नोंद

■ मुंबई (दै. संध्या)

राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये पावसाचा जोर आणखी वाढण्याची शक्यता असून प्रशासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणाऱ्या अधिकृत सूचनांचे पालन करावे असे आवाहन नागरिकांना करण्यात आले आहे. सुरक्षेच्या दृष्टिकोनातून राज्यातील महत्त्वाच्या ठिकाणी १७ राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (NDRF आणि) ६ राज्य आपत्ती प्रतिसाद दल (SDRF) ची पथके सज्ज ठेवण्यात आल्याची माहिती राज्य आपत्कालीन कार्य केंद्र यांनी दिली आहे.

मान्सुन कालावधीकरिता राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (NDRF)पथके पुर्व तैनात करताना पालघर व नागपूर येथे प्रत्येकी २ आणि पुणे, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, सातारा, कोल्हापूर, सांगली व धाराशिव प्रत्येकी १ पथके मुंबई येथे ४ पथके तैनात करण्यात आली आहेत.तसेच राज्य आपत्ती प्रतिसाद दल (SDRF) ची एकूण ६ सज्ज असून धुळे व नागपूर प्रत्येकी २आणि नांदेड, गडचिरोली पथके तैनात आहेत.

मुंबईतील सांताक्रूझ येथे १५१.२ मिमी तर कुलाबा येथे १२८ मिमी पावसाची नोंद झाली. याशिवाय लोणावळा येथे ६७० मिमी, अंबोना येथे ५३७ मिमी, ताम्हिणी येथे ५८० मिमी, भिवपुरी येथे २६६ मिमी, विभाग येथे ३०५ मिमी, निलशी येथे २७५ मिमी, मुळशी येथे २३० मिमी, माथेरान येथे ३०२ मिमी, कर्जत येथे २९१.५ मिमी, पनवेल येथे १८२.५ मिमी, जुहू विमानतळ येथे ३२५.० मिमी आणि भाईंदर येथे १८८.५ मिमी पावसाची नोंद झाली. माथेरान, लोणावळा, खोपोली व लोहगड परिसरात पावसाची तीव्रता अत्यंत जास्त असल्यामुळे भूस्खलनाचा धोका निर्माण झाला आहे. या भागांसाठी रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे.जिल्हा व राष्टीय प्रतिसाद बल यांच्याशी सतत समन्वय साधून बचाव कार्य चालू आहेतSEOC मधून GEO-DSS प्रणाली चा वापर करून धोका आणि प्रवणतेचे सखोल विश्लेषण करून अलर्ट प्रसारित करण्यात येत आहेत. मुंबई ते गोवा राष्ट्रीय महामार्गावर कशेडी घाटात दरड कोसळी असल्याने वाहतुक बंद करण्यात आली आहे.खोपोली येथे पाणी साचल्याने जुना महामार्ग बंद आहे. पुणे-मुंबई एक्सप्रेसवे , मिसिंग लिंक रस्ता, दरड कोसळुन एक्सप्रेस-वे दोन्ही बाजूंची वाहतुक बंद आहे. मंकी हिल ते ठाकुरवाडी पर्यंत दरड कोसळल्या रेल्वे वाहतुक बंद आहे. पुणे-मुंबई रेल्वे मार्ग बंद आहे. रस्ते व रेल्वे वाहतूक सुरळीत करण्यासाठी दरडी हटवण्याचे काम युध्दपातहीवर सुरू आहे.

मावळ तालुक्यातील घोरावाडी येथे (तळेगाव दाभाडे) पुरामध्ये एक बस २५ नगरिकांसाहित अडकली होती, NDRF पथक पाठवून नागरिकांना सुखरूप बाहेर काढण्यात आले आहे. मावळ मधील पाटण येथे एक घर दरडी खाली दबले असून ३ ते ४ नागरिक दबले असण्याची शक्यता आहे.

# लंबित चौकशी प्रकरणे तातडीने निकाली काढा – केंद्रीय उपसचिव सुदीप दत्ता

■ मुंबई (दै. संध्या)

२०२२ मध्ये शिष्यवृत्ती योजनांतील निधीच्या गैरवापराच्या प्रकरणांनंतर ८३० शैक्षणिक संस्थांची प्रकरणे केंद्रीय अन्वेषण विभागाकडे (CBI) आणि ६० हजारांहून अधिक प्रकरणे विविध राज्यांकडे चौकशीसाठी सोपविण्यात आली आहेत. ही प्रकरणे निकाली निघाल्याशिवाय योजना पूर्ण क्षमतेने पुन्हा सुरू करणे शक्य होणार नाही. त्यामुळे राज्यांनी चौकशी प्रक्रियेला गती देऊन प्रलंबित प्रकरणांची चौकशी तातडीने करण्याचे निर्देश केंद्रीय अल्पसंख्याक कार्य मंत्रालयाचे उपसचिव (शष्यवृत्ती)सुदीप दत्ता यांनी दिले. केंद्र शासनाच्या पूर्व-माध्यमिक (Pre-Matric), उत्तर-माध्यमिक (Post-Matric) आणि गुणवत्ता व साधनआधारित (Merit-cum-Means) शिष्यवृत्ती योजनांबाबत प्रलंबित चौकशी प्रकरणांचा आढावा घेऊन योजनांची प्रभावी अंमलबजावणी पुन्हा सुरू करण्याच्या उद्देशाने अल्पसंख्याक कार्य मंत्रालय, भारत सरकार आणि महाराष्ट्र शासनाच्या अल्पसंख्याक विकास विभागाच्या संयुक्त विद्यमाने सचिवालय जिमखाना, मुंबई येथे महाराष्ट्र, राजस्थान, गुजरात, मध्य प्रदेश आणि दादरा व नगर हवेली व दीव दमण या पाच राज्यांची प्रादेशिक कार्यशाळा आयोजित करण्यात आली. कार्यशाळेत महाराष्ट्र, राजस्थान आणि मध्य प्रदेश या राज्यांतील वरिष्ठ अधिकारी सहभागी झाले. अल्पसंख्याक विकास विभागाच्या सचिव डॉ. माधवी खोडे चवरे यावेळी उपस्थित होत्या. उपसचिव सुदीप दत्ता म्हणाले राज्यांकडून झालेल्या प्रगतीचा आढावा घेऊन चौकशीदरम्यान येणाऱ्या अडचणी, तपास यंत्रणांसमोरील समस्या आणि त्यावरील उपाययोजनांवर कार्यशाळेत सविस्तर चर्चा करण्यात आली असून प्रकरणे निकाली काढण्यासाठी आवश्यक समन्वय साधून त्यानंतर वित्त मंत्रालय, खर्च विभाग, मंत्रिमंडळ सचिवालय आणि पंतप्रधान कार्यालयाकडे शिष्यवृत्ती योजना पुन्हा सुरू करण्याचा प्रस्ताव पाठविण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. यावेळी त्यांनी राज्यांना ३१ जुलैपर्यंत गैरवापर झालेल्या निधीच्या वसुलीसाठी प्रभावी प्रयत्न करण्याचे, आवश्यकतेनुसार बँकांची मदत घेण्याचे, वसुली न झाल्यास एफआयआर नोंदविण्याची प्रक्रिया राबविण्याचे, तसेच १ ते १५ ऑगस्टदरम्यान क्लोजर रिपोर्ट सादर करण्याचे निर्देश दिले. या मुदतीत प्रकरणांचा निपटारा झाल्यास शिष्यवृत्ती योजना पुन्हा सुरू करण्याच्या प्रक्रियेला गती मिळेल, असे त्यांनी सांगितले.१५ ऑगस्टपर्यंत आवश्यक उद्दिष्टे पूर्ण करून शिष्यवृत्ती योजना पुन्हा सुरू करण्यासाठी केंद्र व राज्यांनी समन्वयाने कार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

# रवींद्र माणगावे यांनी स्वीकारला नवनिर्वाचित अध्यक्षाचा पदभार

■ गाव तिथे उद्योजक' उपक्रमाद्वारे ग्रामीण महाराष्ट्रात क्रांती घडवणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

■ मुंबई (दै. संध्या)

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड एग्रिकल्चर (MACCIA) च्या २०२६-२०२८ या कार्यकाळासाठीचा भव्य पदग्रहण सोहळा यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे उत्साहात पार पडला. या समारंभात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते नवनिर्वाचित अध्यक्ष रवींद्र माणगावे यांनी अध्यक्षपदाची धुरा स्वीकारली. या ऐतिहासिक प्रसंगी ग्रामीण महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेला गती देण्यासाठी MACCIA च्या 'गाव तिथे उद्योजक' या अत्यंत महत्त्वाकांक्षी उपक्रमाचे अधिकृत अनावरण करण्यात आले.




या मोहिमेचे कौतुक करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, "महाराष्ट्राला एक ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था बनवण्याच्या उद्दिष्टाकडे वाटचाल करण्यासाठी प्रशासन MACCIA च्या या संकल्पनेच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे."

या उपक्रमाला गती देण्यासाठी राज्य सरकार आणि MACCIA संयुक्तपणे 'उद्योजक जनता दरबार' सुरू करणार असून, याद्वारे औद्योगिक आणि व्यावसायिक तक्रारींचे थेट आणि जलद निवारण केले जाईल, अशी ग्वाही उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिली.

२०२६ ते २०३१ या पाच वर्षांच्या कालावधीत राबवल्या जाणाऱ्या या मोहिमेचे उद्दिष्ट राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यांमध्ये ३६,००० ग्रामीण सूक्ष्म उद्योजक तयार करण्याचे आहे. या व्यापक आर्थिक चळवळीमुळे ग्रामीण भागात १.४४ लाखांहून अधिक स्थानिक रोजगार संधी निर्माण होतील आणि उपक्रमाच्या तिसऱ्या वर्षापर्यंत अंदाजे ₹३,६०० कोटींची वार्षिक आर्थिक उलाढाल होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

पदभार स्वीकारल्यानंतर MACCIA चे अध्यक्ष रवींद्र माणगावे यांनी आपल्या संकल्पनेवर भर दिला. ते म्हणाले, "हा उपक्रम ग्रामीण तरुण, महिला, शेतकरी आणि स्वयंसहाय्यता गटांना सर्वसमावेशक प्रशिक्षण, तंत्रज्ञान, आर्थिक सहाय्य आणि सरकारी कल्याणकारी योजनांशी अखंड जोडणी प्रदान करून सक्षम करेल; ज्यामुळे 'नोकरी शोधणाऱ्यांचे रूपांतर नोकरी देणाऱ्यांमध्ये' होईल."

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे पार पडलेल्या या हायप्रोफाईल कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उद्योगमंत्री उदय सामंत, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, विधानपरिषद सदस्य प्रवीण दरेकर, आमदार राहुल आवाडे, राजेंद्र पाटील यड्रावकर, बाबुराव कदम कोहळीकर आणि सत्यजित देशमुख, तसेच MACCIA चे अध्यक्ष रवींद्र माणगावे, ट्रस्ट बोर्डाचे अध्यक्ष आशिष पेडणेकर, मावळते अध्यक्ष संतोष मंडलेचा, ज्येष्ठ उपाध्यक्ष करुणाकर शेट्टी, गव्हर्निंग कौन्सिल, व्यवस्थापन समिती आणि कार्यकारी समितीचे सदस्य उपस्थित होते.



# पंढरीची वारी : एक अविस्मरणीय आध्यात्मिक भक्तीप्रवास

आमच्या बद्दल : महाराष्ट्र पर्यटन विभागची ३१ मे २०१६ रोजी स्थापना झाली. राज्याचा समृद्ध सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी आणि पर्यटन क्षेत्र अधिक बळकट करण्याच्या उद्देशाने या विभागाची स्थापना करण्यात आली. पर्यटन आणि संस्कृती यांची नाळ एकमेकांशी घट्ट जोडलेली आहे. कारण ऐतिहासिक स्मारके, लोककला आणि स्थानिक परंपरा या केवळ सांस्कृतिक ठेवा नसून पर्यटन आकर्षण म्हणूनही ओळखल्या जातात. हेच लक्षात घेऊन महाराष्ट्र सरकारने धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी आणि या क्षेत्रांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी स्वतंत्र मंत्रिमंडळ स्तरावरील विभाग स्थापन केला. सदर विभाग महाराष्ट्रातील अद्वितीय कला प्रकार, परंपरा आणि ऐतिहासिक स्थळे जपण्यासाठी, त्यास प्रोत्साहन देण्यासाठी आणि त्यांची जागतिक स्तरावर ओळख निर्माण करण्यासाठी कार्य करतो. तसेच, सांस्कृतिक देवाणघेवाण वाढवून, पर्यटन विकासाला चालना देऊन हा विभाग राज्याच्या सामाजिक आणि आर्थिक प्रगतीमध्ये महत्त्वाचे योगदान देत आहे. सदर विभागाच्या प्रयत्नांमुळे महाराष्ट्र राज्य केवळ एक पर्यटन स्थळ म्हणूनच नव्हे, तर एक जिवंत संस्कृती आणि वारसा असलेले राज्य म्हणून अधिक समृद्ध आणि आकर्षक बनत आहे.

महाराष्ट्र ही संतांची आणि अखंड भक्तीने पावन झालेली भूमी आहे. या भूमीच्या परंपरेचा आणि अध्यात्माचा सर्वात मोठा उत्सव म्हणजे पंढरपूरची आषाढी वारी. दरवर्षी ज्येष्ठ आणि आषाढ महिन्यात अवघा महाराष्ट्र विठ्ठलमय वातावरणामध्ये दंग होऊन जातो. मानवी भावना, शिस्त, भक्ती आणि निसर्गाचे मोहून टाकणारे रुप वारीमध्ये अनुभवायला मिळते.

देशभरातील सर्वात मोठा आणि शिस्तबद्ध मानवी उत्सव म्हणून पंढरपूर वारीकडे पाहिले जाते. दरवर्षी आषाढी वारीच्यानिमित्ताने लाखो वारकरी विठुरायाचे नामस्मरण करत शेकडो किलोमीटरची पायपीट करतात. केवळ विठुरायाच्या भेटीसाठी वय, जात, धर्म, भाषा, हे सर्व भेद विसरून लाखो लोक एकाच ध्येयाने प्रवास करत असतात. पायी चालत चालत पंढरपूरच्या दिशेने निघालेला वारकरी विठ्ठलभक्ती, समता, सेवा आणि मानवतेचा संदेश देत असतो.

एका पर्यटकाच्या दृष्टीने तर वारी अनुभवणे म्हणजे सुखाचा सोहळा आहे. परदेशातून तसेच देशविदेशातून येणाऱ्या पर्यटकांना आषाढी वारीमध्ये महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक आणि आध्यात्मिक परंपरेचे अभूतपूर्व दर्शन घडते. 'ज्ञानबा-तुकाराम'च्या जयघोषाने दुमदुमून जाणारा परिसर पर्यटकांना भक्तीमय वातावरणामध्ये घेऊन जातो.

वारीची खरी सुरुवात संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा (आळंदी) आणि संत तुकाराम महाराज पालखी सोहळा (देहू) यांच्या प्रस्थानाने होते. हजारो वारकरी, हातात टाळ-मृदंग, खांद्यावर भगवी पताका आणि डोक्यावर तुळशी वृंदावन घेऊन 'ज्ञानोबा माऊली तुकाराम'चा गजर करतात. अशावेळी संपूर्ण परिसरामध्ये सकारात्मक उर्जा जाणवते. रंगीबेरंगी पोशाख, कपाळी चंदनाचा टिळा लावलेल्या वारकऱ्यांच्या चेहऱ्यावरील समाधान अनुभवताना मन हरवून जाते. वारी अनुभवण्यासाठी तसेच प्रत्येक क्षण कॅमेऱ्यामध्ये टिपण्यासाठी मोठ्या संख्येने छायाचित्रकार, पर्यटक गर्दी करतात.

वारीदरम्यान होणारे रिंगण सर्वात मोठे आकर्षण असते. वारकऱ्यांनी तयार केलेले एक मोठे वर्तुळ म्हणजे रिंगण. सर्व वारकरी, टाळकरी, झेंडेकरी, मृदुंग वादक, वीणेकरी गोलाकार उभे राहतात. त्यानंतर नामगजरास सुरुवात होते. टाळ-मृदुंगाच्या एकाच तालात वारकरी ठेका धरतात. या तालातच भरधाव वेगाने दिंडी सोहळ्यातील अश्व गोलाकार प्रदक्षिणा करीत पालखीला अभिवादन करतो. टाळ-मृदुंगाचा वेग, जयजयकार आणि वाऱ्याच्या वेगाने धावणारा अश्व हे सारे दृश्य प्रत्यक्ष अनुभवण्यासाठी लाखोंची गर्दी जमा होते. अश्व धावून गेल्यानंतर त्याच्या टापांखालील माती कपाळाला लावण्यासाठी भाविक आतुर होतात. याशिवाय 'उभे रिंगण' आणि 'आडवे रिंगण' तयार करुन यामध्ये वारकरी फुगड्या खेळतात, धावण्याच्या स्पर्धा आयोजित करतात आणि वेगवेगळ्या पारंपरिक लोककला सादर करतात.

जुन्या मुंबई-पुणे मार्गावरून आणि सासवडच्या दिवे घाटातून वारीचा प्रवास सुरु असतो. विठ्ठल नामाचा गजर करत लाखो वारकरी दिवे घाटातून मार्गस्थ होत असतानाचे दृश्य स्वर्ग सुखाचा अनुभव देते. पावसाच्या हलक्या सरी, सर्वत्र पसरलेली हिरवळ, डोंगर-रागांमधून वाहणारे छोटे-मोठे धबधबे आणि त्यामधून वाट काढत जाणारे वारकरी हे सारे क्षण डोळ्यांमध्ये साठवून ठेवण्यासारखे असतात. एखाद्या ड्रोन कॅमेऱ्याच्या नजरेमधून दिवे घाटाचा परिसर पाहताना भक्ती आणि निसर्गाचा अनोखा संगम अनुभवायला मिळतो.

विठ्ठल नामाच्या गजरात स्वतःला विसरून जाणारे वारकरी, भारतीय अध्यात्म, लोकसंस्कृती आणि संत परंपरा जवळून अनुभवण्यासाठी देश-विदेशातील पर्यटक, अभ्यासकही वारीमध्ये सहभागी होतात. एकता, सेवाभाव, श्रद्धा, अध्यात्म हाच जीवनातील खरा आनंद आहे हे वारी आपल्याला आपसुकच शिकवते. पांडुरंगाच्या ओढीने सुरु झालेला हा प्रवास प्रत्येकाला आत्मचिंतन करण्याची संधी देतो आणि यामधूनच आध्यात्माची गोडी निर्माण होते.

पंढरपूर वारीच्या निमित्ताने पर्यटकांना महाराष्ट्राच्या वैविध्यपूर्ण आध्यात्मिक वैभवाचा प्रवास अनुभवता येतो.

विठुरायच्या भेटीबरोबरच अनेक महत्त्वाची आध्यात्मिक स्थळे पाहता येतात. देहू आणि आळंदी ही संत तुकाराम महाराज व संत ज्ञानेश्वर महाराज यांची पुण्यभूमी वारकरी परंपरेचा समृद्ध वारसा अनुभवण्याची संधी देतात. त्यानंतर अष्टविनायकाचे मुख्य पीठ असलेल्या मोरगावच्या मयूरेश्वराचे दर्शन घेऊन हा प्रवास पुढे सुरु राहतो. 'येळकोट येळकोट जय मल्हार' म्हणत जेजुरी गडावर नतमस्तक होऊन पुढचा प्रवास करता येतो. सोलापूर जिल्ह्यातील तुळजापूर येथील श्री तुळजाभवानी मंदिर, अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ महाराज मंदिर, गाणगापूर येथील दत्तसंप्रदायाचे पवित्र क्षेत्र ही जागृत देवस्थाने आध्यात्मिक भव्यता द्विगुणित करतात.

अखेरीस पंढरी नगरी गाठल्यानंतर विठ्ठल-रुक्मिणी मंदिराचे रुप डोळ भरुन पाहण्याबरोबरच संत नामदेव पायरी, पुंडलिक मंदिर, चंद्रभागा नदी घाट, गोपाळपूर यांना भेट देता येते. पंढरपूर वारीकडे फक्त धार्मिक यात्रा म्हणून न पाहता यामधून महाराष्ट्राच्या समृद्ध आध्यात्मिक आणि सांस्कृतिक पर्यटनाचे अविस्मरणीय दर्शन घडते.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### सियाचं 4 महिन्यांपूर्वीच झालेलं लग्न, व्हॉटसअप चॅटमधून धक्कादायक खुलासा

लोहगड (दैनिक संध्या) : लोहगडावरून ढकलून देत केतन अग्रवाल याची हत्या करणाऱ्या सियाबाबत आता धक्कादायक माहिती समोर आली आहे. सिया गोयल आणि केतन अग्रवाल यांचा साखरपुडा झाला होता. पण सियाला हे लग्न करायचं नसल्यानं तिने प्रियकर चेतन चौधरी याच्या मदतीने केतनला लोहगडावरून ढकलून त्याची हत्या केल्याचे आरोप होत आहेत. या प्रकरणी सिया आणि चेतनला पोलिसांनी ताब्यात घेतल्यानंतर केलेल्या चौकशीत अनेक खुलासे झाले आहेत. सिया आणि चेतन चौधरी यांच्या व्हॉटसअप चॅटचा डेटा पोलिसांच्या हाती लागला आहे. त्यात गेल्या ६ ते ८ महिन्यात दोघांमध्ये झालेल्या संवादातून अनेक धक्कादायक बाबी उघड झाल्या आहेत. यात सिया आणि चेतन यांनी चार महिन्यापूर्वीच लग्न केल्याचं समोर आल्याचा दावा पोलिसांनी केलाय. घरच्यांचा विरोध असल्यानं सिया आणि चेतन यांनी चार महिन्यापूर्वी गुपचूप लग्न केलं होतं. त्यांच्या या लग्नाचा खुलासा व्हॉटसअप चॅटमधून झाला आहे. आता या माहितीमुळे हत्याकांडाला वेगळं वळण लागण्याची शक्यता आहे. पोलिसांच्या हाती तांत्रिक पुरावे आणि माहिती लागली असून त्याचा तपास केला जात आहे. केतन अग्रवालची १८ जून रोजी लोहगडावरून ढकलून हत्या झाली होती. या प्रकरणी पोलिसांनी सिया गोयल आणि केतन चौधरी यांना अटक केलीय. दोघांचे कॉल रेकॉर्ड, लोकेशन, चॅट आणि इंटरनेट हिस्ट्री तपासण्यात आली. सियाने घरच्यांच्या भीतीने चेतनसोबत केलेलं लग्न लपवून ठेवलं होतं. दरम्यान, कुटुंबियांनी केतनसोबत लग्न ठरवलं आणि साखरपुडाही झाला. तरीही सिया गप्प होती, शेवटी तिने केतनला आपल्या मार्गातून हटवण्यासाठी लोहगडावरून ढकलून देत हत्या करण्याचा कट रचल्याचा दाट संशय व्यक्त करण्यात येत आहे. केतनची हत्या करण्याचा प्लॅनही सियाने केला होता. मात्र तिचं धाडस होत नसल्यानं चेतनला सोबत येण्यासाठी सिया विचारत होती. यासंदर्भातही दोघांमध्ये व्हॉटसअपवर चर्चा झाली होती. माझं धाडस होत नाहीय, तूसुद्धा सोबत चल. आपण दोघं त्याला दरीत ढकलून देऊ असा मेसेज सियाने चेतनला पाठवल्याचंही पोलिसांनी म्हटलंय.

### फेक इन्स्टाग्राम आयडी तयार करून महिलेला ब्लॅकमेल; बारामतीतील युवक अटकेत

वडगाव निंबाळकर (दैनिक संध्या) : फेक इन्स्टाग्राम अकाऊंट तयार करून एका महिलेला अश्लील संदेश पाठवत तिचे नग्न फोटो व व्हिडिओ मिळविण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी करंजे (ता. बारामती) येथील एका युवकाविरुद्ध वडगाव निंबाळकर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दिपक मधुकर दुबळे (रा. करंजे, ता. बारामती) याने एका महिलेच्या नावाने बनावट इन्स्टाग्राम आयडी तयार केला होता. या आयडीच्या माध्यमातून फिर्यादी महिलेशी संपर्क साधून अश्लील स्वरूपाचे फोटो पाठविले. तसेच "तुझे खासगी फोटो व्हायरल करायचे नसतील तर माझ्याशी नग्न अवस्थेत व्हिडिओ कॉलवर बोल" अशी धमकी देत महिलेवर दबाव टाकल्याचा आरोप आहे. आरोपीने महिलेकडून प्राप्त झालेले फोटो व व्हिडिओ आपल्या मोबाईलमध्ये जतन करून ते परिसरातील काही व्यक्तींना पाठविल्याने फिर्यादीची बदनामी झाली तसेच तिच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. याप्रकरणी वडगाव निंबाळकर पोलिस ठाण्यात बाल लैंगिक अपराध संरक्षण कायदा, माहिती तंत्रज्ञान अधिनियमातील विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीला अटक करून बारामती न्यायालयासमोर हजर केले असता दोन दिवसांची पोलीस कोठडी देण्यात आली आहे. इतर व्यक्ती विषयी असे काही प्रकार केल्या आहेत का यासाठी आरोपीचा मोबाईल ताब्यात घेतला असून फॉरेन्सिक लॅबला पाठवण्यात येणार आहे यावरून अधिक माहिती उघड होईल असे पोलिसांच्या वतीने सांगण्यात आले. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

### पुरंदरमध्ये धडाका! कऱ्हा नदी दुथडी भरून, सिद्धेश्वर बंधारा ओसंडून वाहू लागला

सासवड (दैनिक संध्या) : पुरंदर तालुक्यात गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे शेतकऱ्यांत आनंदी वातावरण आहे. पुरंदर किल्ला परिसरात झालेल्या दमदार पावसामुळे कऱ्हा नदी दुथडी भरून वाहू लागली असून सासवड येथील सिद्धेश्वर बंधारा पूर्ण क्षमतेने भरून ओसंडून वाहत आहे. तसेच चरणावती नदीलाही पाणी आले आहे. या नयनरम्य दृश्याचा आनंद घेण्यासाठी सासवड येथील संगमेश्वर मंदिरासमोरील पुलावर नागरिकांची गर्दी होत आहे. दरम्यान, पावसामुळे परिंचे येथील चौधरवाडीमध्ये मानसिंग चौधरी यांच्या घराची भिंत कोसळून नुकसान झाले. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. प्रशासनाने घटनास्थळी पाहणी करून पंचनामा केला आहे. महसूल विभागाच्या माहितीनुसार मंगळवारी सकाळी नऊ पर्यंत तालुक्यात एक घर पडझडीची घटना नोंदविण्यात आली असून कोणतीही जीवितहानी अथवा स्थलांतराची वेळ आलेली नाही. तहसील कार्यालयाकडून मिळालेल्या पावसाच्या नोंदीनुसार भिवडी मंडळात सर्वाधिक १५८ मिमी, सासवड ९७ मिमी, जेजुरी ७५ मिमी, परिंचे ६९ मिमी, राजेवाडी ५७ मिमी, वाल्हे ५५ मिमी, कुंभारवळण ४३ मिमी आणि शिवरी ३७ मिमी पावसाची नोंद झाली आहे.

# माऊलींच्या मानाच्या अश्वांची 'दगडूशेठ' गणपतीला अनोखी मानवंदना

**गणेश मंदिराच्या सभामंडपात अश्वांचा प्रवेश ; विश्वस्त, मंडळाच्या कार्यकर्त्यांतर्फे अश्वांचे पूजन**



पुणे (दै. संध्या)

माऊली माऊली, ज्ञानोबा माऊली तुकाराम आणि जय गणेश... गणपती बाप्पा मोरया अशा गणेशभक्तांनी केलेल्या जयघोषाने झालेल्या भक्तिमय वातावरणात संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखी सोहळ्यातील मानाच्या अश्वांनी श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिराच्या सभामंडपात प्रवेश करीत अनोखी मानवंदना दिली. अश्वांचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी मंदिरात मोठी गर्दी केली होती.

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळ तर्फे मंदिरात या अश्वांचे पूजन करण्यात आले. कर्नाटक बेळगावमधील अंकली येथून शितोळे सरकार यांच्या मालकीच्या या दोन अश्वांचे आगमन पुण्यामध्ये झाले. यावेळी ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, ट्रस्टचे विश्वस्त, पदाधिकारी, कार्यकर्ते यांसह श्रीमंत उर्जितसिंह शितोळे (सरकार), श्रीमंत महादजी राजे शितोळे (सरकार) तसेच पुणेकर मोठया संख्येने उपस्थित होते.

शितोळे सरकार म्हणाले, माऊलींचे अश्व आणि गणरायाची ही अनोखी भेट आहे. यंदा देखील गणेशाचे दर्शन घेऊन हे अश्व आता आळंदी कडे प्रस्थान करतील. दरवर्षी सुमारे ३०० किलोमीटरचा पायी प्रवास करुन हे अश्व वारीला जातात. दरवर्षी अश्व गणरायासमोर सभामंडपात जाऊन मानवंदना देत असून ही शुभ गोष्ट आहे.

ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने म्हणाले, वारीची शेकडो वर्षांची परंपरा आहे. आषाढी वारी ही विठ्ठल भक्तांची वारी आहे. त्यामुळे ज्यांना या वारीला येता येत नाही, ते या अश्वांचे दर्शन घेतात. गेल्या काही वर्षांपासून हे अश्व मंदिराच्या सभामंडपात येऊन गणरायाला मानवंदना देत आहेत. यंदा देखील या अश्वांनी मंदिरात येत गणरायाचे दर्शन घेतले. कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी म्हणाले, ट्रस्टतर्फे वारी अंतर्गत मोफत रुग्णवाहिका सेवा, आरोग्य तपासणी, भोजन सेवा हरित वारी, स्वच्छता अभियान, अनेक उपक्रम राबविले जातात. त्या सर्व उपक्रमांची सुरुवात या कार्यक्रमाने होत असून ट्रस्ट नेहमीच वारकऱ्यांच्या सेवेत नानाविध उपक्रम राबवित राहिल.

## खडकवासला धरण ८१% भरले; कालव्यातून पाणी सोडण्यास सुरुवात

पुणे (दै. संध्या)



खडकवासला धरणाच्या पाणलोट क्षेत्रात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे धरणातील पाणीसाठ्यात झपाट्याने वाढ होत आहे. मंगळवारी (७ जुलै) दुपारी १२ वाजेपर्यंत धरण ८१ टक्के भरल्याने नवीन मुठा उजव्या कालव्यातून ५०० क्युसेक्स वेगाने पाणी सोडण्यास सुरुवात करण्यात आली आहे. अधीक्षक अभियंता प्रवीण कोल्हे यांच्याशी चर्चा करून हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती कार्यकारी अभियंता किरण देशमुख यांनी दिली. धरण क्षेत्रातील सरासरी पर्जन्यमान आणि सुरू असलेली पाण्याची आवक लक्षात घेता खडकवासला धरण ८५ ते ९० टक्के भरल्यानंतर सांडव्यातून पाण्याचा विसर्ग सुरू करण्याबाबत निर्णय घेतला जाईल, असा इशाराही खडकवासला पाटबंधारे विभागाने दिला आहे.

पाटबंधारे विभागाच्या माहितीनुसार, गेल्या २४ तासांत खडकवासला धरणसाखळीतील चारही धरणांमध्ये मिळून ३,७८५ एमसीएफटी (३.७८५ टीएमसी) पाण्याची आवक झाली आहे. तर सोमवारी सायंकाळी ५ ते मंगळवारी सकाळी ६ या अवघ्या १३ तासांत २.३६ टीएमसी पाणीसाठ्यात वाढ झाली. यामध्ये वरसगाव धरणात सर्वाधिक १,४३५ एमसीएफटी पाण्याची आवक नोंदविण्यात आली आहे. पावसाचा जोर कायम राहिल्यास धरणातील पाण्याची पातळी आणखी वेगाने वाढण्याची शक्यता असून, परिस्थितीनुसार सांडव्यातून पाण्याचा विसर्ग सुरू केला जाईल, असे विभागाने स्पष्ट केले आहे.

## सादरीकरणाबरोबर अध्ययनामुळे लोककलेचे संवर्धन

**अभिजीत गोखले यांचे मत : शाहीर हिंगे लोककला प्रबोधिनीच्या शाहिरी भवन गुरुकुलाचा उद्‌घाटन सोहळा**

पुणे (दै. संध्या)



सादरीकरणातून कला जशी जिवंत राहते आणि तिचे संवर्धन होते, तसेच तिला जेव्हा अध्ययनाची जोड मिळते, तेव्हा त्या कलेचा उद्देश समाजापर्यंत अधिक प्रभावीपणे पोहोचतो. लोककलेच्या परंपरेचे स्वरूप काळानुरूप बदलत आहे आणि भविष्यातही बदलत राहणार आहे. मात्र, तिला अध्ययनाची जोड मिळाल्यास तिच्या मूळ भावात कोणताही बदल न होता काळानुसार निर्माण होणाऱ्या गरजा आणि मागणी पूर्ण करणे अधिक सोपे होईल, असे मत संस्कार भारतीचे अखिल भारतीय संघटन मंत्री अभिजीत गोखले यांनी व्यक्त केले. शाहीर हिंगे लोककला प्रबोधिनीच्या शाहिरी भवन गुरुकुलाच्या उद्‌घाटन सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी पश्चिम महाराष्ट्र प्रांताचे रा. स्व. संघाचे संघचालक नानासाहेब जाधव, प्रबोधिनीचे अध्यक्ष आचार्य शाहीर हेमंतराजे मावळे आदी उपस्थित होते. सोमवार पेठेतील शाहिरी भवन गुरुकुलाचे उद्‌घाटन करण्यात आले. त्यानंतर स्वरूपवर्धनी संस्थेच्या सभागृहात विद्यार्थ्यांचे पोवाडा सादरीकरण झाले. यावेळी भवनासाठी सहाय्य करणाऱ्या संस्था व व्यक्तींचा सन्मान करण्यात आला. नानासाहेब जाधव म्हणाले, आपले विचार समर्थपणे, ताकदीने आणि समर्पक शब्दांत मांडतो तो शाहीर. या कलेच्या सादरीकरणातून शाहीर समाजातील प्रश्न परखड शब्दांत मांडत असतात. या कलेच्या संवर्धनासाठी तसेच अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शाहिरी भवन गुरुकुल अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार आहे. लोककलेच्या संवर्धनातील मोलाचे पाऊल आहे," असेही त्यांनी सांगितले.

आचार्य शाहीर हेमंतराजे मावळे म्हणाले, प्रबोधिनीतर्फे कलासंवर्धनासाठी गेल्या तीस वर्षांपासून मोफत पोवाडा वर्गाचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना दिले जात आहे. त्याचे पुढचे पाऊल म्हणजे शाहिरी भवन गुरुकुल आहे. स्व. गुरुवर्य शाहीररत्न किसनराव हिंगे यांनी शाहिरीकलेसाठी पुण्यामध्ये आपली एक वास्तू असावी असा ध्यास घेतला होता. त्यांचे हे स्वप्न पूर्ण करीत आहोत. शाहिरीवर अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हे भवन नेहमीच खुले असणार आहे, असेही त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अक्षदा इनामदार यांनी व आभार प्रदर्शन अरुणकुमार बाभुळगांवकर यांनी केले.

## भिसे यांचा सांस्कृतिक प्रकोष्ठ शहराध्यक्ष पदाचा सदस्यत्वाचा राजीनामा

पिंपरी (दै. संध्या)



भाजपच्या असंतोषजनक कार्य पद्धतीला कंटाळून विजय भिसे यांनी शहर सांस्कृतिक प्रकोष्ठ अध्यक्ष पदाचा आणि आणि सदस्यत्वाचा राजीनामा दि ५ जुलै २०२६ रोजी पक्षाचे शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांच्याकडे सुपूर्द केला.अशी माहिती प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकाद्वारे दिली आहे.

यापुढील काळात व्यक्तिगत पातळीवरील लेखन, वाचन, प्रवास याबरोबरच पिंपरी चिंचवड कल्चरल फाऊं डेशनच्या माध्यमातून कला, साहित्य, संगीत या क्षेत्रासाठी वाहून घेतले जाणार आहे. साहित्यिक, विचारवंत, बुध्दीजीवी विचारांच्या लोकांना तसेच विविध कलाकार यांना केंद्रीय स्तरापासून ते स्थानिक स्वराज्य संस्थांच्या जागांवर कोठेही अधिकार आणि अंमलबजावणीचे स्वातंत्र्य देऊन आदराने स्थान दिल्याचे अभावानेच दिसते. अनेकवेळा त्यांची उपेक्षा झाल्याचेच दिसून येत आहे. देशपातळीवर युवक, विद्यार्थी, शेतकरी, कामगार या घटकांच्या समस्या दिवसेंदिवस वाढतानाच दिसत आहे. अलिकडच्या काळातील नीट ची परीक्षा आणि इतर परीक्षांचे पेपर फुटल्याने पंधरा ते वीस विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या आणि बावीस लाख विद्यार्थ्यांना वेठीला धरले गेले. या प्रकाराबद्दल देशपातळीवर विविध निदर्शन होत असताना देखील सरकार त्याची नैतिक जबाबदारी स्वीकारण्यास पुढे येण्याचे दायित्व दाखवताना दिसत नाही.

तसेच धार्मिक विषयांना प्राधान्य देऊन सामाजिक असंतोष वाढला आहे.

सलोखा बिघडल्याचे चित्र देशभर शहर आणि खेड्या-पाडयातून देखील दिसू लागले आहे. नुकत्याच झालेल्या अयोध्या येथील श्रीराम मंदीराच्या दानपेटीतील लूट उघडकीस आली. ज्या श्रध्देने या मंदीराची उभारणी देश पातळीवर तळागाळातील लोकांनी यथाशक्ती केली त्यांच्या भावनांना आज मोठा तडा गेला आहे.

हे सर्व पाहता माझ्या सारख्या वैचारिक व्यक्तींना सामाजिक पातळीवर जाऊन काम करणाऱ्या अशा असंख्य बुध्दीजीवी आणि संवेदनशील व्यक्तिंच्या समूहाला वेदना झाल्यावाचून राहत नाही.

आदरणीय आमदार श्री. शंकरभाऊ जगताप आणि शहराध्यक्ष श्री शत्रुघ्न बापू काटे यांनी मला विश्वासाने दिलेल्या जबाबदारीतून मुक्त होत असताना त्यांचे संविनय आभार व्यक्त करुन वरील पदाचा राजीनामा देत आहे.

## २१ कोटींचा रस्ता पुन्हा उखडला! पालखीला अवघे तीन दिवस

पुणे (दै. संध्या)



उघडलेली खडी आणि पायलिंगचे खड्डे यामुळे पुणे-सोलापूर या संत तुकाराम महाराज पालखी महामार्गाची मोठ्या प्रमाणात दुरावस्था झाली आहे. हडपसर रवीदर्शन ते कवडीपाट टोलनाका या सुमारे पाच किलोमीटर अंतरातील डांबरीकरण उखडून सर्वत्र खडी पसरली आहे. तसेच पायलिंगचे खड्डे पूर्ववत न केल्याने तेही उखडून त्याठिकाणी धोकादायक खड्डे निर्माण झाले आहेत. या भागातून मार्गस्थ होणाऱ्या पालखी सोहळ्याला केवळ तीन दिवस बाकी असून वारकऱ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने प्रशासनासमोर पालखी मार्गाच्या दुरूस्तीचे आव्हान निर्माण झाले आहे. सुमारे २१ कोटी रुपये खर्चून केलेल्या या रस्त्याच्या निकृष्ट बांधकामाचे पितळ गेल्या वर्षीच उघडे पडले होते. त्यावर पुन्हा खर्च करून डांबराचा थर देण्यात आला होता. मात्र, सध्याच्या पावसात हात थरही उखडून संपूर्ण रस्त्यावर बारीक खडी पसरली आहे. त्यावरून दुचाकी घसरून छोटे-मोठे अपघात होऊ लागले आहेत. मोठ्या वाहनांच्या टायर मधून ही खडी उडत आहे. याशिवाय महामार्गावर उभारल्या जाणाऱ्या उड्डाणपूलाच्या पायलिंग टेस्टसाठी खड्डे घेतले गेले आहेत. तेही खोलवर उखडले आहेत. त्यामुळे प्रवाशांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे.

## आरोग्य शिबिर, वृक्षारोपण आणि 'स्टार्टअप उद्योग ३६५ दिवस काम' अभियानाची घोषणा

पिंपरी (दै. संध्या)



**महिला उद्योजकतेला नवी दिशा**

दुर्गा ब्रिगेड राष्ट्रीय पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा दुर्गा भोर यांच्या वाढदिवसानिमित्त भोसरी एमआयडीसी परिसरात महिला सक्षमीकरण, उद्योजकता विकास, आरोग्य आणि पर्यावरण संवर्धनाला चालना देणारे विविध सामाजिक उपक्रम उत्साहात पार पडले.

कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण ठरलेल्या महिलांच्या औद्योगिक सहलीत सहभागी महिलांनी एमआयडीसीतील अत्याधुनिक उद्योगांना भेट देत रोबोटिक मशिनरी, ऑटोमेशन तंत्रज्ञान, आधुनिक उत्पादन प्रक्रिया आणि उद्योग व्यवस्थापनाचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. अनेक महिलांनी प्रथमच रोबोट तंत्रज्ञान जवळून पाहिले. पारंपरिक कौशल्यांपासून आधुनिक उद्योगविश्वापर्यंतचा हा प्रवास महिलांसाठी प्रेरणादायी ठरला. उद्योग क्षेत्रातील संधींची प्रत्यक्ष माहिती मिळाल्याने महिलांमध्ये उद्योजकतेबाबत नवा आत्मविश्वास निर्माण झाला.

यावेळी फोरम ऑफ स्मॉल स्केल इंडस्ट्रीज असोसिएशनचे अध्यक्ष श्री. अभय दादा भोर यांनी महिला उद्योजकांना मार्गदर्शन केले. त्यांनी समूह उद्योग (Group Enterprise) या संकल्पनेचे महत्त्व स्पष्ट करताना महिला एकत्रितपणे उद्योग उभारल्यास भांडवल, तंत्रज्ञान, यंत्रसामग्री, बाजारपेठ आणि शासकीय योजनांचा अधिक प्रभावी लाभ घेता येतो, असे सांगितले. यामुळे रोजगारनिर्मितीला चालना मिळून महिलांच्या आर्थिक स्वावलंबनाला बळ मिळेल, असे त्यांनी नमूद केले.

यावेळी "स्टार्टअप उद्योग – ३६५ दिवस काम" या अभियानाची माहिती देताना आगामी काळात महिला उद्योजक घडविण्यासाठी उद्योग प्रशिक्षण, उद्योग भेटी, तांत्रिक मार्गदर्शन, शासकीय योजनांची माहिती आणि उद्योग उभारणीसाठी आवश्यक सहकार्य सातत्याने उपलब्ध करून दिले जाईल, अशी घोषणा करण्यात आली.

वाढदिवसानिमित्त आयोजित मोफत आरोग्य तपासणी शिबिरात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. तसेच पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

वृक्षारोपण समारंभ पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे उपायुक्त मा. पंकज पाटील तसेच वरिष्ठ वाहतूक पोलीस निरीक्षक मा. रामचंद्र घाडगे यांच्या हस्ते संपन्न झाला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी महिला सक्षमीकरण, उद्योगविकास आणि पर्यावरण संरक्षणासाठी अशा लोकाभिमुख उपक्रमांचे कौतुक केले.

या कार्यक्रमास उद्योजक, महिला, सामाजिक कार्यकर्ते, नागरिक आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली. महिलांना रोजगार शोधणाऱ्या नव्हे, तर रोजगार निर्माण करणाऱ्या उद्योजिका बनविण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला. भविष्यातही महिला स्वावलंबन आणि उद्योगविकासासाठी अशा समाजोपयोगी उपक्रमांचे सातत्याने आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती दुर्गा ब्रिगेड राष्ट्रीय पक्षाच्या वतीने देण्यात आली.

## भोसरी एमआयडीसीत मुसळधार पावसाने हाहाकार

**अनेक कंपन्या बंद, उद्योजकांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान**

पिंपरी (दै. संध्या)



भोसरी एमआयडीसी परिसरात झालेल्या मुसळधार पावसामुळे अनेक कंपन्यांमध्ये पावसाचे पाणी शिरून उत्पादन ठप्प झाले असून यंत्रसामग्री, कच्चा माल, तयार माल तसेच अन्य साहित्याचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले आहे. अनेक कंपन्यांना तात्पुरते कामकाज बंद ठेवण्याची वेळ आली आहे.

घटनास्थळी भेट देऊन उद्योजकांच्या समस्या जाणून घेतल्यानंतर इंडस्ट्रीज असोसिएशनचे अध्यक्ष अभय भोर यांनी प्रशासनाच्या दुर्लक्षाबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली. त्यांनी सांगितले की, एमआयडीसी परिसरात प्रभावी ड्रेनेज व्यवस्था नसल्याने मुख्य रस्ते, चौक आणि औद्योगिक परिसर जलमय झाला. परिणामी अनेक कंपन्यांमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी साचून उद्योगांचे मोठे आर्थिक नुकसान झाले.

घटनास्थळी भेट देऊन उद्योजकांच्या समस्या जाणून घेतल्यानंतर फोरम ऑफ स्मॉल स्केल इंडस्ट्रीज असोसिएशनचे अध्यक्ष अभय भोर यांनी प्रशासनाच्या दुर्लक्षाबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली. त्यांनी सांगितले की, एमआयडीसी परिसरात प्रभावी ड्रेनेज व्यवस्था नसल्याने मुख्य रस्ते, चौक आणि औद्योगिक परिसर जलमय झाला. परिणामी अनेक कंपन्यांमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी साचून उद्योगांचे मोठे आर्थिक नुकसान झाले.

यावेळी अनेक उद्योजकांनी निदर्शनास आणून दिले की, परिसरातील अनेक पावसाळी गटारींची कामे अद्याप अपूर्ण आहेत. अनेक ठिकाणी चेंबर चुकीच्या उंचीवर बसविण्यात आले असून डांबरीकरण करताना रस्त्यांच्या नैसर्गिक उताराचा कोणताही विचार करण्यात आलेला नाही. त्यामुळे अनेक ठिकाणी खोलगट भाग तयार झाले असून तेथे मोठ्या प्रमाणात पाणी साचत आहे. परिणामी मालवाहू वाहने व इतर वाहने पाण्यात अडकून बंद पडण्याच्या घटनाही घडल्या. शासन आणि संबंधित यंत्रणा केवळ औपचारिक पाहणी करून निघून जातात; मात्र औद्योगिक परिसरातील मूलभूत समस्या कायम आहेत. राज्याच्या महसुलात मोठे योगदान देणाऱ्या उद्योजकांना अशा प्रकारच्या निष्काळजीपणाचा सामना करावा लागत असल्याबद्दल उद्योग क्षेत्रात तीव्र संताप व्यक्त होत आहे.